| लातूर | वर्ष ३५ वे | अंक २२२ | शनिवार, दिनांक २८ नोव्हेंबर २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू. PRGI No.47034

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

Email-dainiklatursamachar@gmail.com

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे




## पाण्याच्या इतर सर्व वापरांपेक्षा पिण्याच्या पाण्याच्या पुरवठ्याला प्राधान्य दिलेच पाहिजे : हायकोर्ट

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था:** पाण्याच्या पुरवठ्याला इतर सर्व वापरांपेक्षा पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्याला प्राधान्य दिले पाहिजे, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण राजस्थान उच्च न्यायालयाने नोंदवले. तसेच राज्य सरकारला राजसमंद सरोवरात पुरेसा पाणीसाठा राखून ठेवण्याचे निर्देश शही न्यायमूर्ती विनीत कुमार माथूर आणि न्यायमूर्ती संदीप शाह यांच्या खंडपीठाने दिले.

**प्रकरण काय?**

'लाईव्ह लॉ'ने दिलेल्या वृत्तानुसार, उच्च न्यायालयाच्या २०१० मधील एका आदेशानुसार, राजस्थानमधील राजसमंद तलावातील पाण्याची उपलब्धता तपासण्यासाठी आणि कोणतीही टंचाई निर्माण होऊ न देता पिण्याच्या पाण्यासाठी किती पाणी राखीव ठेवावे हे निश्चित करण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात आली होती. मात्र, गेल्या काही वर्षांत राज्य सरकारने राजसमंदच्या पिण्याच्या पाण्याच्या गरजेबाबत वेगवेगळी भूमिका घेतली, असा युक्तिवाद याचिकाकर्त्याच्या वतीने करण्यात आला होता.

**याचिकेतून कोणती मागणी ?**

पिण्याच्या पाण्यासाठी राजसमंद तलावात पुरेसा पाणीसाठा राखीव ठेवण्याच्या मागणीसाठी राजस्थान उच्च न्यायालयात याचिका दाखल झाली होती. यावर न्यायमूर्ती विनीत कुमार माथूर आणि न्यायमूर्ती संदीप शाह यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली.

काळाच्या ओघात नळ जोडण्यांची संख्या वाढली असून, यंदा या भागात अपुरा पाऊस झाल्याने पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेबाबत चिंता निर्माण झाली आहे. त्यामुळे सिंचन आणि इतर वापरांपेक्षा पिण्याच्या पाण्याच्या पुरवठ्याला प्राधान्य देण्याचे निर्देश राज्य सरकारला द्यावेत, अशी मागणी याचिकाकर्त्याने केली होती.

**पुरेसा पाणीसाठा राखीव ठेवला जाईल : सरकारी वकिलांची ग्वाही**

दुसरीकडे, राज्य सरकारच्या वकिलांनी प्रतिज्ञापत्राचा संदर्भ देत सांगितले की, प्रशासन पिण्याच्या पाण्याच्या गरजेबाबत गंभीर असून इतर सर्व वापरांपेक्षा पिण्याच्या पाण्यालाच प्राधान्य देण्याची गरज ओळखून आहे.

जिल्ह्याची गरज लक्षात घेऊन तलावात पुरेसा पाणीसाठा राखीव ठेवला जाईल, अशी ग्वाही सरकारी वकिलांनी न्यायालयाला दिली.

**पाण्याच्या पुरवठ्याला इतर सर्व वापरांपेक्षा प्राधान्य दिलेच पाहिजे**

दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर आणि सरकारचे प्रतिज्ञापत्र तपासल्यानंतर खंडपीठाने म्हटले की, प्रतिज्ञापत्रावरून हे स्पष्ट होते की, सक्षम अधिकाऱ्यांनी राजसमंद तलावातील पाण्याची उपलब्धता आणि जिल्ह्याला पिण्यासाठी लागणाऱ्या पाण्याचे आवश्यक मूल्यांकन केले आहे. प्रतिवादींनी पिण्याच्या पाण्यासाठी पुरेशी पातळी राखून पाणी राखीव ठेवले आहे. या परिस्थितीत, याचिकाकर्त्याने या जनहित याचिकेद्वारे मांडलेली समस्या आणि चिंता यांची प्रशासनाने आधीच दखल घेतली असल्याचे आमचे मत आहे. राजसमंदसह कोणत्याही जिल्ह्यात पिण्याच्या पाण्याच्या पुरवठ्याला इतर सर्व वापरांपेक्षा प्राधान्य दिलेच पाहिजे, यावर न्यायालयाने विशेष भर दिला.

## बांधकाम साहित्य व शेतीपंपाच्या वायर चोरी करणाऱ्या दोघांना अटक; १ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

**उदगीर/प्रतिनिधी:** उदगीर ग्रामीण पोलीस ठाण्याच्या पथकाने शेतीपंपाच्या वायर तसेच बांधकामासाठी वापरण्यात येणाऱ्या सेंट्रिंग प्लेट चोरी करणाऱ्या दाघांना अटक करून त्यांच्याकडून एकूण अंदाजे १ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे उदगीर ग्रामीण व उदगीर शहर पोलीस ठाण्यात दाखल असलेले तीन चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत.

दि. ३१.०३.२६ रोजी उदगीर ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीतील एका शेतातील पाण्याच्या मोटारीची वायर चोरी झाल्याबाबत उदगीर ग्रामीण पोलीस ठाण्यात गुरनं. १६४/२०२६, कलम ३०३(२) भारतीय न्याय संहिता २०२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्याचा तपास व चोरी गेलेल्या मालाचा शोध सुरू असताना पोलीस पथकाला गोपनीय बातमीदारामार्फत लोणी रोड परिसरात दोन इसम मोटारसायकलवर फिरत असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पथकाने तत्काळ घटनास्थळी जाऊन दोघांना ताब्यात घेतले. रेहान जावेद मनियार, वय २१ वर्षे व आश्पाक करीम शेख, वय २० वर्षे, दोघे रा. नांदेड नाका, उदगीर, ता. उदगीर अशी आहेत.त्यांच्याकडे सखोल चौकशी केली असता चोरीच्या गुन्ह्यांशी संबंधित मुद्देमाल मिळून आला. त्याच्याकडून बांधकामासाठी वापरण्यात येणाऱ्या १८० सेंट्रिंग प्लेट – अंदाजे किंमत ८०,००० रुपये. तसेच ड्रीम युगा कंपनीची मोटारसायकल (क्रमांक एमएच २४ एए ७८१९) – अंदाजे किंमत २०,००० रुपये.३.स्प्लेंडर कंपनीची मोटारसायकल (क्रमांक एमएच २४ झेड १२९८) – अंदाजे किंमत ५०,००० रुपये. व रोख रक्कम – १०,००० रुपये.अशा प्रकारे एकूण अंदाजे १ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदरची कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी गजानन भातलवंडे यांच्या मार्गदर्शनाखाली उदगीर ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री. दिलीप गाडे यांच्या नेतृत्वाखाली पथकातील पोलीस अमलदार संदीप केंद्रे, नामदेव चेवले, राजकुमार डबेटवार, सचिन नाडागुडे, बजरंग गजलवार, राजकुमार देवडे व नजीर बागवान यांनी केली आहे.सदर गुन्ह्यांचा पुढील तपास पोलीस अंमलदार फारुख शेख करीत आहेत.

## ऊसाला प्रतिटन ४२०० रुपये भाव द्या अन्यथा शेतकरी उद्रेकाला सामोरे जा: डॉ नरसिंह भिकाने

**निलंगा/प्रतिनिधी:** तुमच्या करोडो रुपयांचा फायदा करणारा शेतकरी आज दुष्काळामुळे अंत्यवस्थ आहे त्याला हातभार लावण्यासाठी या हंगामत ऊसाला प्रतिटन ४२०० रुपये भाव द्या अन्यथा शेतकरी उद्रेकाला सामोरे जा असा कडक ईशारा मनसे जिल्हाध्यक्ष डॉ नरसिंह भिकाने यांनी ओंकार साखर कारखाना,अंबुलगा येथील धरणे आंदोलनात दिला आहे.यावेळी ऊस दरवाढ संघर्ष समितीचे संतोष नागरगोजे,राजकुमार सस्तापुरे,शिवाजी पेटे,गजानन बोळणगे,प्रशांत पाटील,वाहेद शेख उपस्थित होते. या वेळी बोलताना डॉ भिकाने यांनी गतवर्षीच्या हंगामात या कारखान्यात झालेले गाळप व त्यातून तयार झालेली साखर,बगास,मळी व प्रेसमड याचे टनामधील निर्मिती,त्याचा बाजार भाव सांगून अभ्यासपूर्णरित्या आर्थिक गणित सांगत ह्या कारखान्याला खर्च जाता करोडो रुपयांचा फायदा कसा झाला आहे हे सांगितले. ते म्हणाले की गत हंगामात हा कारखाना एवढा फायद्यात राहूनही जर अद्याप गतवर्षीचे ऊसबिले थकीत ठेवत असेल तर हा निर्लज्जपणाचा कळस आहे आणि जर ही रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर तात्काळ जमा नाही केली तर चौकाचौका मध्ये शेतकरी तुम्हाला चाबकाने फोडल्याशिवाय राहणार नाही व त्याचे नेतृत्व आम्ही करू असा सज्जड इशाराही त्यांनी या वेळी दिला आहे.पुढे बोलताना डॉ भिकाने म्हणाले की जिल्ह्यातील सर्वच कारखान्यांनी गेटकेनचा ऊस न आणता प्राधान्याने कार्यक्षेत्रातील ऊस लवकरात लवकर गाळप करावा.हार्वेस्टर मालकांनी शेतकऱ्यांची होणारी आर्थिक पिळवणूक तात्काळ थांबवावी तसेच पाण्याअभावी वाळत असलेल्या ऊसाला प्रोग्राम चा निकष न लावता तो ऊस प्राधान्याने गाळप करावा. शेतकऱ्यांनी उसाचे वजन जर बाहेरील वजन काट्यावर करून तर त्याची खात्री करून ते वजन ग्राह्य धरावे अन्यथा आम्ही तुमची मापे काढू असा इशाराही त्यांनी दिला.या वेळी ऊस दरवाढ संघर्ष समिती कडून संतोष नागरगोजे, राजकुमार ससतापुरे,शिवाजी पेटे,प्रशांत पाटील यांनीही आपल्या भूमिका मांडल्या.



या धरणे आंदोलनात मनसे,प्रहार,विविध शेतकरी संघटना,भारतीय किसान सेना आदी राजकीय पक्षांचे प्रमुख पदाधिकारी सामील झाले होते.या धरणे आंदोलनात उल्हास सूर्यवंशी,सोमनाथ कलशेट्टी,सचिन बिराजदार,सूरज पटेल,महेश मसलगे,प्रदीप शेळके,विकास सूर्यवंशी, बालाजी पवार आदींसह शेतकरी व पदाधिकारी उपस्थित होते.

## दयानंद महाविद्यालयात अभाविपचा 'पंखांना बळ देणारी भेट' कार्यक्रम उत्साहात संपन्न

**लातूर/प्रतिनिधी:** अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, छत्रपती शिवाजी महाराज नगर शाखेच्या वतीने स्त्रीशक्ती दिनानिमित्त विद्यार्थिनींसाठी 'पंखांना बळ देणारी भेट' हा प्रेरणादायी कार्यक्रम केला. या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक व अतिथी म्हणून महात्मा गांधी पोलीस स्टेशनच्या दामिनी पथक पोलीस उपनिरीक्षक सौ. सावित्रा रायपल्ले आणि दयानंद महाविद्यालयाच्या प्रशासकीय अधिकारी सौ. ऋतुजा देशमुख यांची विशेष उपस्थिती होती. तसेच अभाविप देवगिरी प्रदेश कार्यकारिणी सदस्य विशाल परिहार, नगरमंत्री गजानन राठोड यांच्यासह विद्यार्थी परिषदेचे प्रमुख कार्यकर्ते तसेच महाविद्यालयातील विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

पोलीस उपनिरीक्षक सौ. सावित्रा रायपल्ले यांनी विद्यार्थिनींना महिला सुरक्षा, कायदेशीर संरक्षण आणि स्वसंरक्षणाच्या विविध तंत्रांबाबत सखोल मार्गदर्शन केले. संकटकाळी न डगमगता धाडसाने सामोरे जाण्याचे आवाहन केले.

दयानंद महाविद्यालयाच्या प्रशासकीय अधिकारी सौ. ऋतुजा देशमुख यांनी महिलांचे हक्क, उच्च शिक्षणाचे महत्त्व आणि आर्थिक व मानसिक स्वावलंबन यावर प्रकाश टाकला. महिलांनी प्रत्येक क्षेत्रात आत्मविश्वासाने पुढे येत आणि स्वतःच्या हक्कांबाबत जागरूक राहावे, असा मोलाचा संदेश त्यांनी दिला.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक नगरमंत्री गजानंद राठोड यांनी केले, तर अभाविप मांडणी अभाविप देवगिरी प्रदेश कार्यकारिणी सदस्य विशाल परिहार यांनी केली. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन अपूर्वा काळे यांनी पार पाडले. विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास, सामाजिक जागरूकता आणि स्वावलंबनाची भावना निर्माण करणारा हा उपक्रम अत्यंत यशस्वी ठरला. 'वंदे मातरम्'ने कार्यक्रमाची समारोप झाला.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर बहुजन कर्मचारी जयंती उत्सव समितीद्वारा क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांना विनम्र अभिवादन

**लातूर/प्रतिनिधी:** डॉ.बाबासाहेब आंबेडकर बहुजन कर्मचारी जयंती उत्सव समिती, लातूर द्वारा सन २०२२ पासून महापुरुषांच्या जयंती, पुण्यतिथी, विविध सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रम आणि समाज प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

आज क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला समिती अध्यक्ष प्राचार्य डॉ.संजय वाघमारे आणि सर्व पदाधिकारी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. त्यानंतर महापुरुषांच्या नावाने घोषणा देण्यात आल्या.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.एस.एस.स्वामी हे होते प्रमुख मार्गदर्शक प्राचार्य डॉ.सिद्धार्थ सूर्यवंशी, उपप्राचार्य प्रा.कल्याण कांबळे, उपप्राचार्य सदाशिव शिंदे, कोषाध्यक्ष तथा प्रसिद्धी प्रमुख डॉ.संजय गवई, प्रा.प्रशांत उघाडे, विनायक बोरीकर, नागोराव कांबळे आणि ड.सुरेशचंद्र सलगरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

**प्रभात किरणे**

कर्तुत्वाने यशस्वी होतो तेव्हा....
जग कौतुक करे,त्यात स्वार्थ असतो
मित्र नाती कौतुक करतातनि:स्वार्थपणे
सूर्याचे तेज,चंद्र शीतल, पण डाग दिसतो
**इंजि. नागनाथ कलवले**
9764788288

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



**डिलिमिटेशन विधेयकाला केंद्रीय मंत्रिमंडळात मंजुरी...**



**चिमटा दयाचा**

**लातूरातील सर्वच रस्त्याची आवस्था बिकट झाली आहे!!**
**रस्ते का खड्डा हेच कळत नाही, त्यामुळे दुरूस्ती बरोबर पुर्ननिर्माणाची गरज आहे!!**
**रस्ता खराब किंवा फोडल्यास कडक दंडाची तरतुद हवी आहे!!!**

## टंचाई निवारणाच्या कामांत दिरंगाई नको; मृद व जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य द्यावे-पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले

### जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत खर्चाचा आढावा, पुनर्विनियोजनास मंजुरी;भूजल पुनर्भरणासाठी प्रत्येक गावात १ हजार जलतारा खड्डे घेण्याचा निर्णय

**लातूर/प्रतिनिधी: जिल्ह्यातील पाणी व चारा टंचाईचा सामना करण्यासाठी टंचाई निवारणाच्या कामांना गती द्यावी. या कामांत कोणतीही दिरंगाई होता कामा नये. टंचाई काळातील उपाययोजना, भूजल पुनर्भरणाची कामे लवकरात लवकर सुरू करण्यासाठी प्रशासकीय मान्यता व अनुषंगिक कार्यवाही तातडीने पूर्ण करावी, असे निर्देश राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी येथे दिले.**




जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन समिती सभागृहात पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समितीची बैठक झाली. या बैठकीस सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष उषाताई पाटील, खासदार डॉ. शिवाजी काळगे, आमदार बसवराज पाटील, आमदार अभिमन्यू पवार, जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहूल कुमार मीना, जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त राहूल कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती. तर खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर, आमदार विक्रम काळे, आमदार संभाजी पाटील निलंगेकर, आमदार संजय बनसोडे, आमदार रमेश कराड हे दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले होते. बैठकीच्या सुरुवातीला मागील बैठकीचा अनुपालन अहवाल सादर करण्यात आला.

दुष्काळावर मात करण्यासाठी सर्वजण मिळून काम करावे लागणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासन आपल्या पाठीशी आहे, त्यांच्या मार्गदर्शनानुसार जिल्हा पातळीवर टंचाई निवारणाच्या उपाययोजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्व प्रशासकीय यंत्रणांनी सजग राहून काम करावे. टंचाई निवारणासाठी हाती घेण्यात येणाऱ्या कामांना गती द्यावी. शेतकऱ्यांना पीक विमा कंपनीकडून भरीव मदत मिळवून देण्यासाठी शासन, प्रशासन प्रयत्नशील असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही विमा कंपन्यांना सूचना दिल्या आहेत. तसेच जिल्हास्तरावरही याबाबत सुरुवातीपासूनच जिल्हा प्रशासनामार्फत आवश्यक खबरदारी घेण्यात येत आहे, असे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले म्हणाले.

पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले म्हणाले, जिल्ह्यात चारा लागवडीस प्रोत्साहन देऊन स्थानिक पातळीवर जास्तीत जास्त चारा उपलब्ध करावा. जलसंधारण आणि भूजल पुनर्भरणासाठी मोहीम स्वरूपात कामे हाती घेतली जाणार असून, जिल्हा प्रशासनाने जिल्ह्यातील प्रत्येक गावात १ हजार जलतारा खड्डे करण्याचे नियोजन केले आहे. जिल्ह्यात गाव तिथे स्मशानभूमी उपक्रमांतर्गत ८ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे, आवश्यकता असल्यास वाढीव निधी देण्यात येईल. मात्र, सर्व गावांमध्ये स्मशानभूमी उभारणीसाठी प्रयत्न करावेत, असे त्यांनी सांगितले. टंचाई काळात तात्पुरत्या पाणी पुरवठा योजनांना लवकर मंजुरी देऊन पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य द्यावे व पाण्याचा अवैध उपसा रोखावा, अशा सूचना सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी केल्या. सिंचन प्रकल्पातील गाळ उपशास प्रोत्साहन देणे, नादुरुस्त बंधारे व प्रकल्पांची तातडीने दुरुस्ती करणे, 'जलतारा' उपक्रमास गती देणे आणि बळीराजा पांदण रस्ते व मृद-जलसंधारणाच्या कामांतून रोजगार उपलब्ध करून देण्यावर त्यांनी भर द्यावा. तसेच, लातूर शहरातील गरुड चौक ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौक दरम्यानच्या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याची सूचनाही त्यांनी केली.

जिल्हा परिषद अध्यक्ष उषाताई पाटील म्हणाल्या, टंचाई निवारणासाठी कपात करण्यात आलेला जिल्हा नियोजन समितीचा २० टक्के कपात निधी जिल्हा परिषदेच्या टंचाई उपाययोजनांसाठी उपलब्ध करून द्यावा. यामाध्यमातून ग्रामीण भागात टंचाई उपाययोजना हाती घेता येतील. खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर म्हणाले, सद्यस्थितीत तातडीच्या उपाययोजना राबविताना जलतारा कामाला गती द्यावी. मायक्रो फायनान्स संस्थांना वसुली रोखण्यासाठी सूचना द्याव्यात. कर्जमुक्ती झालेल्या शेतकऱ्यांना बँकेने त्याबाबतची माहिती उपलब्ध करून देण्याच्या सूचना द्याव्यात. जलजीवन मिशनच्या पाणी पुरवठा योजनांच्या पंपांना २४ तास वीज मिळावी यासाठी गावठाण फिडरवरून वीज पुरवठा करावा, असे त्यांनी सांगितले.

खासदार डॉ. शिवाजी काळगे म्हणाले, प्रलंबित स्मशानभूमी शेडची कामे सुरू करावीत व वन्यजीवांसाठी पाणवठे तयार करून त्यात पुरेसे पाणी ठेवावा. लातूर शहरातील विद्युत पुरवठा सुरळीत होण्यासाठी विद्युत उपकेंद्राच्या जागेचा प्रश्न निकाली काढावा.

आमदार संभाजी पाटील निलंगेकर म्हणाले, सद्यस्थितीत ज्या प्रकल्पात पाणी उपलब्ध आहे, त्यातील पाणी त्या प्रकल्पावर अस्तित्वात असलेल्या योजनांना प्राधान्य द्यावे. उजनीचे धाराशिव जिल्ह्यात येणाऱ्या पाण्याच्या ठिकाणहून लातूर शहराच्या पाणी पुरवठ्याबाबत प्रयत्न करावेत. भविष्यातील टंचाईची तीव्रता लक्षात घेऊन सूक्ष्म नियोजन करावे. चारा लागवडीसाठी वाढीव अनुदान देण्याबाबत शासनाकडे प्रयत्न करावा, असे ते म्हणाले.

आमदार विक्रम काळे म्हणाले, पाणी टंचाईमुळे शेतकरी ऊस गाळपासाठी घाई करत आहेत. त्यांची अडवणूक होवू नये, यासाठी साखर कारखान्यांची बैठक घेऊन सूचना द्याव्यात.

आमदार बसवराज पाटील म्हणाले, लातूर शहराच्या पाणी पुरवठ्यासाठी रामदरा प्रकल्पातून १ टीएमसी पाणी मिळण्याचा प्रस्ताव शासनास तातडीने सादर करावा. तसेच टंचाई काळात नागरिकांना स्थानिक स्तरावर रोजगार उपलब्ध होण्यासाठी यासाठी व्हीबी- जी राम जी योजनेची कामे सेल्फवर ठेवावीत.

अभिमन्यू पवार म्हणाले, आमदार अभिमन्यू पवार म्हणाले, सध्या टंचाईची दाहकता वाढत असून पुढील काही दिवसांत तीव्रता अधिक वाढणार आहे. त्यामुळे पिण्याच्या पाण्यासह पशुधनाच्या पाण्यासाठीही सूक्ष्म नियोजन करावे. लातूर सारख्या अवर्षणग्रस्त जिल्ह्यात जलतारा, नदी- नाले सरळीकरण व खोलीकरण सारख्या जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य द्यावे. ग्रामस्तरीय अधिकारी यांनी गावामध्ये उपस्थित राहून टंचाई काळातील उपाययोजनांची काळजीपूर्वक अंमलबजावणी करावी. सर्वजण मिळून या संकटाचा मुकाबला करावा, असे ते म्हणाले. आमदार संजय बनसोडे म्हणाले, चारा लागवडीसाठी प्रोत्साहन देणे आवश्यक असून यासाठी शेतकऱ्यांना वाढीव निधी द्यावा. तसेच जळकोट तालुक्यातील स्मशानभूमी नसलेल्या गावांमध्ये तातडीने निधी उपलब्ध करून द्यावा. टंचाई निवारण, भूजल पुनर्भरण कामासाठी जळकोट तालुक्याला प्राधान्य दिले जावे. लातूरसाठी रामदरा प्रकल्पातून पाणी आणण्यासाठी पाठपुरावा करण्यात यावा.

कृष्णा खोऱ्यातील पाणी उजनी धरणातून रामदरा प्रकल्पात येत असून, लातूरची पाणी टंचाई परिस्थिती लक्षात घेवून रामदरा धरणातून लातूरलाही पाणी मिळावे, याबाबतचा ठराव यावेळी सर्वानुमते घेण्यात आला. तसेच याबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणने प्रस्ताव व अंदाजपत्रक तयार करावे, असे निर्देश पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी दिले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारातून धाराशिवपर्यंत उजनीचे पाणी पोहोचत असून, लातूरच्या पाण्याबाबतही ते सकारात्मक निर्णय घेतील असा विश्वास पालकमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला. एड्स नियंत्रण कार्यक्रमात सुरक्षित जिल्ह्याच्या यादीत लातूर जिल्ह्याचा समावेश झाल्याने जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांचा नवी दिल्ली येथे सन्मान होणार आहे, त्यांचा अभिनंदनाचा ठरावही यावेळी घेण्यात आला.

### जिल्हा वार्षिक योजनेच्या खर्चाचा आढावा

**जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२६-२७ साठी शासनाकडून ४८४ कोटी रुपयांचा अंतिम नियतव्यय मंजूर झाला असून आतापर्यंत २९०.४० कोटी रुपये इतका निधी प्राप्त झाला आहे. या योजनेअंतर्गत २० नोव्हेंबर २०२६ अखेर झालेल्या खर्चाचा सविस्तर आढावा बैठकीत घेण्यात आला. सद्यस्थितीत जिल्हा वार्षिक योजनेतून ८४.०६ कोटी रुपयांच्या प्रशासकीय मान्यता निर्गमित करण्यात आल्या असून त्यापैकी ७४.०४ कोटी रुपये वितरीत केले आहेत, तर मागील अपूर्ण कामे पूर्ण करणे (स्पील) तसेच चारा विकास कार्यक्रम, हातपंप व विद्युतपंप दुरुस्ती यांसारख्या महत्त्वाच्या कामांसाठी आतापर्यंत ६१.७३ कोटी रुपये खर्च झाले आहेत, अशी माहिती जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी यांनी यावेळी दिली.**

ओ३म् भूर्भुव: स्व: ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो न: प्रचोदयात् ।।

## लातूर समाचार

### पिण्याचे पाणी व जनावरांना चारा महत्वाचा

राज्यात दुष्काळ जाहिर झाला आहे. यावर्षी शेतात पिक नाही तर जनावरांना चारा नाही असे दुहेरी संकट शेतकऱ्यावर आले आहे. तसे पाहिले तर राज्यावरच संकट आले आहे. त्यामुळे विचाराने पावले टाकण्याची गरज आहे. वास्तविक संकटे आली पाहिजेत, त्याशिवाय सुधार होणार नाही. लोकही व्यवस्थित चालणार नाहीत. वेळीच लक्ष दिले असते तर आज दुष्काळ-दुष्काळ म्हणून ओरडण्याची वेळ आली नसती. मुळात नियोजनाचा अभाव मोठा आहे. नैसर्गिक संकट अचानक निर्माण होत नाहीत तर टप्पा-टप्प्याने येत असते. दहा वर्षापासून जगात उष्णतेचे वाढते प्रमाण आहे. देशात वाळवंट होत आहे. पाण्याचे संकट भेडसावत आहे. संतुलित हवामानाचा परिणामाने कोठे पाऊसाने पुर येतो तर कोठे दुष्काळाची स्थिती निर्माण झाली आहे. गतवेळेस हवामान तज्ज्ञाने संदेश दिला होता की, अलनिनोचे संकट येणार आहे. सहामहिण्यापुर्वी मिळालेल्या संकटाच्या सुचनेचे कोणीही, कोणतीही उपायोजना केली नाही? कोणतेही ठोस पावले उचललेले नाही. उलट त्या बाबीकडे दुर्लक्ष होते गेल्याचे दिसून येते. त्याचा परिणाम आज भोगावा लागत आहे. राणात पावसाअभावी पिके नाहीत. जनावरांना पाणी पाजावे कसे किंवा त्यांना चारा घालावा कसा हा मोठा प्रश्न आहे. तसे पाहिले तर पुर्वी सारखे जनावरे नाहीत. जी थोडीफार आहेत ती जगवावे कसे हा मोठा प्रश्न आहे. प्रशासन म्हणजे सरकार अजून विचारात आहे. जिल्हा बाहेर चारा घेवुन जाण्यास बंदी आहे. मुळात जिल्ह्यातच चारा उपलब्ध नाही. ही वस्तूस्थिती आहे. एखादे वेळी इतर राज्यातून गव्हू किंवा अन्नधान्य आणता येईल.पाणी कोठून आणायाचे हा सर्वात मोठा प्रश्न आहे संकटही आहे. निसर्गाने पाऊस पाडला तरच पाणी मिळते. निसर्गाला पोषक असणारे घटक मानवाने नष्ट केले. एकतर नदीतील वाळू मोठ्या प्रमाणात उपसा केला. विकली गेली. नदीतील पाणी झिरपायाला चान्सच नाही. अनेक धरणातील गाळ तसाच आहे. तो काढण्यासाठी उपायोजना आखली नाही. गाळाने धरणे भरल्यास पाणी साठा कसा होईल? मोठ्या प्रमाणात झाडाची कत्तल झाली. ही कत्तल सर्वांच्या साक्षीने आजूनही होते. याकडे कानडोळा व गैरप्रकारामुळे निसर्गाची हानी झाली आहे. त्यामुळे आता यावर मात करायाचे झाले तर शक्य नाही. एक झाड लावल्यावर वर्ष लागते. तोडायाला सहा तास लागत नाहीत, मात्र निसर्गाची, मानवाने जीवसृष्टिची किती हानीकेली आहे याचा अंदाज घेतला पाहिजे. नैसर्गिक संकट आल्यास केवळ ओरड होते. अलनिनाचे संकट येणार हे कळल्यावर कोणीही खबरदारी घेतली गेली. कोणती उपायोजनेचा आरंभ केला. याचा विचार केला पाहिजे. मुळात निसर्गाचे संकट आले नाही तर मानावने ते निर्माण केले आहे याचा शांत डोक्यांनी विचार करावा. उगाच निसर्गाला दोष देवू नये. निसर्ग आपल्या मार्गाने मार्गक्रम करीत असतो मात्र त्याला छेडणारे माणूस आहे. मानावाने हे संकट निर्माण केले असे म्हटले तर चुकीचे ठरणारे नाही. पुर्वी पाऊस काळ अधिक होता. वेळेवर पडत होता, आता निसर्गाचे चक्रच बदलले आहे. निसर्ग साथ देत नाही मात्र निसर्गाचे चक्र का बदलले. याला कारणीभुत कोण आहेत याचा विचार केला पाहिजे. राज्यात दुष्काळ जाहिर झाल्यापासुन अजूनही ठोस उपयोजना नाही. आता कोठे कृष्णाखोरे व उजणीच्या पाण्याची मागणी केली जात आहे. लातूरपेक्षा धारशिव बरे त्यांनी उजनीपासून पाईपलाईन तरी टाकली आहे. कृष्णाखोरेचे काम चालू आहे. आता दुष्काळात कृष्णाखोऱ्यातून पाणी मिळावी अशी मागणी करणे ते शक्य आहे का? लातूर हे वाढते शहर आहे. लातूर राज्यात विकासाचे शहर आहे. वाढती लोकसंख्या पाहाता अनेक समस्या आहेत. त्याची सोडवणुक होणे क्रमप्राप्त आहे. सध्याला सर्वात महत्वाचे म्हणजे दुष्काळ निवारणार्थ कामे करणे व दुसरी बाब म्हणजे दुष्काळ आगामी काळात पडला किंवा पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण झाली तर त्यावरील उपायोजनेवर विचार, या बाबीची सोडवणुक केली पाहिजे. काही झाले तरी आता निसर्गाचा ऱ्हास करू नये. या बाबत शासनाने कडक धोरण स्विकारावे लागेल. मुळात बऱ्याच बाबी दुर्लक्षित करणे महागात पडणार आहे. ईस्त्राईलचे उदा. आपले नेते देतात, मात्र ईस्त्राईल सारखी उपायोजना का करीत नाहीत? ईस्त्राईल सारचे भारतीय शेतीबाबत का मानिकसता बनवित नाहीत. याचा विचार केला पाहिजे. दुष्काळ मानवनिर्मित आहे व आगामी काळात मानवाच्या चुकीमुळे संकट अटळ आहे. पाण्याचे कधी ऑडीट केले का? पाण्याचा वापर कधी काटकसरीने केला का ? या बाबीचा विचार केला पाहिजे. बिनधास्त पाण्याची नासाडी केली जाते. कमी पाण्यावर येणारी पिक घेण्यात येत नाही. सर्वाधिक ऊसाचे उत्पादन घेतले जाते. एक वर्षाचे पीक ऊस आहे. साखर कारखाने हे नेत्याची आहेत. पाण्याअभावी ऊस उत्पादित केला गेला नाही तर नेत्यांची साखर कारखाने कसे चालणार? त्यामुळे दुष्काळाची झळ हे ग्रामीण भागातील नागरिकांना व शेतकऱ्यांना बसत आहे. त्यासाठी प्रत्यक्षात मदतीची गरज व अमलबजावणी सर्वांना समजणे आवश्यक आहे. भारतीय मोठे आळशी आहेत. दुष्काळाची चाहुल सहामहीणे अगोदर मिळून सुद्धा काहीच उपायोजना केली नाही.हे उघड दिसून येते. पावसाळ सुरु होण्यास सहा महिण्याचा आवधी आहे. त्यामुळे पहिल्यांदा सहा महिण्याचे नियोजन केले पाहिजे. राणात पीक नाही, जनावरांसाठी पाण्याचे संकट आहे. सर्व काही उघड असताना कोणती ठोस उपायोजना केली आहे. नुकतेच ग्रामीण भागातील शेतकऱ्याना रास्त भाव दुकानातून राशन मिळण्याची घोषणा केली आहे त्याची अंमलबजावणी होण्यास किती वेळ लागणार आहे. अन्नधान्य पिकले तरच समाधान राहाते. नसतो याचा विपरीत परिणाम होतो. चोऱ्या वाढतात. श्रीमंताची घरे लुटली जातात. जनावरे कवडी मोल दराने विक्री केली जातात. काही जनावरे खाटकाच्या दावणीला बांधले जातात. अशी भयाण चित्र निर्माण होते. त्यामुळे नियोजनाची मोठी गरज आहे. काही झाले तरी दुष्काळावर मात करण्यासाठी व आगामी अलनिनोचे संकट दूर करण्यासाठी उपायोजनाची गरज आहे. जिल्हापातळीवर जिल्हाधिकारी व तालुकास्तरावर तहसीलदार व उपजिल्हाधिकारी यांच्या जबाबदारी टाकून दुष्काळ निवारणासाठी ठोस उपायोजनाची गरज आहे. प्राधान्य पिण्याचे पाणी व जनावरांना चारा या बाबीकडे प्रामुख्याने लक्ष द्यावेच लागणार आहे.

# 'ॲग्री वेल्फेअर पोर्टल' - शेतकऱ्यांसाठी डिजिटल व्यासपीठ

**केंद्र शासनाने शेतकऱ्यांसाठी नवे डिजिटल व्यासपीठ म्हणजेच 'ॲग्री वेल्फेअर' हे नवे संकेतस्थळ सुरू केले आहे. या संकेतस्थळाच्या माध्यमातून आता शेतकऱ्यांना सर्व योजना, अनुदान आणि शेतीची माहिती एका क्लिकवर उपलब्ध करून देण्यात आली आहे. या संकेतस्थळाबद्दलची ही माहिती**




प्रशासन अधिक गतिमान आणि पारदर्शक करण्यासाठी माहिती तंत्रज्ञान ही एक अनिवार्य अशी बाब आहे. शासनाचा कारभार अधिक पारदर्शक आणि गतिमान करण्यासाठी माहिती आणि तंत्रज्ञानाचा वापर अत्यावश्यक आहे. माहिती आणि तंत्रज्ञान हे जबाबदार आणि उत्तरदायित्व असलेले प्रशासन निर्माण करते. लोकाभिमुख प्रशासन, विकासात्मक प्रशासन आणि सुप्रशासन अस्तित्वात येण्यासाठी माहिती आणि तंत्रज्ञानाशिवाय भविष्यात दुसरा चांगला पर्याय उपलब्ध होऊ शकणार नाही. म्हणून शासन आणि त्यामधील विविध घटक यांनी सदैव माहिती आणि तंत्रज्ञान याच्या वापराला प्राधान्य आणि प्रोत्साहन दिले पाहिजे. तरच एक लोकाभिमुख, जबाबदार, उत्तरदायी, पारदर्शक, गतिमान आणि परिणामकारक असे सुप्रशासन अस्तित्त्वात येऊ शकेल. ही बाब लक्षात घेऊन अनेक विभागांचे संकेतस्थळ आणि पोर्टल तयार करण्यात येत आहेत.

माहिती व तंत्रज्ञान विकसित करून, त्याचा शासकीय कामकाजात जास्तीत जास्त वापर करून शेतकरी, शेतमजूर, कामगार, दीन-दलित, मागासवर्गीय इत्यादी समाजघटकांना शासन-प्रशासनाकडून प्राधान्याने चांगल्या सेवा सुविधा देण्यावर भर दिला जात आहे. याच उदात्त हेतूने शेतकऱ्यांसाठी केंद्र सरकारचे नवे डिजिटल व्यासपीठ 'ॲग्री वेल्फेअर पोर्टल' (agriwelfare.gov.in) हे नवे संकेतस्थळ सुरू करण्यात आले असून या संकेतस्थळाच्या माध्यमातून आता शेतकऱ्यांना सर्व योजना, अनुदान आणि शेतीची माहिती एका क्लिकवर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या डिजिटल इंडिया संकल्पनेला आणि शेतकरी कल्याणाच्या धोरणाला अनुसरून केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण तसेच ग्रामीण विकासमंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनाखाली 'ॲग्री वेल्फेअर' या संकेतस्थळाची निर्मिती करण्यात आली आहे.

अद्ययावत अशा या 'ॲग्री वेल्फेअर'चे लोकार्पण १९ ऑक्टोबर २०२६ रोजी करण्यात आले. या संकेतस्थळाच्या माध्यमातून देशभरातील शेतकऱ्यांना केंद्र शासनाच्या विविध कृषी योजना, आर्थिक मदत, अनुदाने आणि शेतीविषयक विश्वसनीय माहिती थेट मोबाईलवर उपलब्ध होत आहे. त्यामुळे विविध योजनांची माहिती मिळविण्यासाठी सामान्य माणसाची व शेतकऱ्यांची शासकीय कार्यालयांमध्ये वारंवार जाण्याची गरज कमी होणार असून मध्यस्थांवरील अवलंबित्वही घटणार आहे.

केंद्र सरकार शेतकरी आणि नागरिकांना त्यांच्या मोबाईलच्या माध्यमातून सदैव उपलब्ध असावे, ही प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची स्पष्ट संकल्पना आहे. तंत्रज्ञानाचा खरा उपयोग तेव्हाच होतो, जेव्हा त्याचा लाभ शेतापर्यंत आणि ग्रामीण भागातील नागरिकांपर्यंत पोहोचतो, असे मत केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी लोकार्पण प्रसंगी व्यक्त केले आहे.

या नव्या संकेतस्थळामुळे वेगवेगळ्या शासकीय संकेतस्थळांवर माहिती शोधण्याची कसरत शेतकऱ्यांना करावी लागणार नाही. 'ॲग्री वेल्फेअर' या संकेतस्थळावर पीएम-किसान, ग्री स्टॅक आणि प्रधानमंत्री पीक विमा योजनेसह विविध महत्त्वाच्या कृषीविषयक योजनांची माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध असणार आहे. पात्रता तपासणी, ऑनलाईन अर्ज आणि थेट लाभ हस्तांतरणाच्या (डीबीटी) सुविधांमुळे शासकीय योजनांच्या अंमलबजावणीत पारदर्शकता वाढण्यास मदत होणार आहे.

संकेतस्थळावरील माहिती अचूक आणि नियमितपणे अद्ययावत ठेवण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले गेले आहेत. अपूर्ण किंवा कालबाह्य माहितीमुळे नागरिकांचा व्यवस्थेवरील विश्वास कमी होऊ शकतो, यामुळे सदैव जागरूक राहून पोर्टलवरील माहिती नेहमी अद्ययावत राहील याची दक्षता घेण्यात येत आहे. अल्पभूधारक आणि कमी औपचारिक शिक्षण असलेल्या शेतकऱ्यांनाही हे पोर्टल सहज वापरता यावे, यासाठी भाषा आणि प्रक्रिया सोप्या ठेवण्यावर भर दिला आहे.

डिजिटल सुविधांचा प्रभावी वापर करता यावा, यासाठी देशभरातील कृषी विज्ञान केंद्रांच्या माध्यमातून विशेष प्रशिक्षण मोहीम राबविण्यात येत आहे. या पोर्टलवर शेतकऱ्यांना हवामान, शास्त्रीय शेतीपद्धती, बियाणे व खतांची उपलब्धता आणि कृषीमालाचे बाजारभाव यांचीही माहिती मिळत आहे. यामुळे शेतकऱ्यांना आपले शेतीचे उत्पादन वाढविण्यासाठी तसेच आर्थिक स्थिती चांगली होण्यासाठी पुरक ठरत आहे.

ग्रामीण भागातील मर्यादित इंटरनेट सुविधांचा विचार करून पोर्टल हलके आणि वापरण्यास सुलभ बनविण्यात आले आहे. दिव्यांग व्यक्तींनाही त्याचा वापर करता यावा, यासाठी स्क्रीन रीडर आणि सुलभ नेव्हिगेशनसारख्या सुविधांचा समावेश करण्यात आला आहे.

कोणत्याही पोर्टलचे यश त्यावरील माहितीच्या अचूकतेवर आणि वेळेतील उपलब्धतेवर अवलंबून असते. जुनी किंवा अपूर्ण माहिती प्रणालीवरील विश्वास कमी करते; त्यामुळे पोर्टलवरील सर्व माहिती सतत अद्ययावत ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. याव्यतिरिक्त, पोर्टलची भाषा आणि प्रक्रिया इतक्या सोप्या असाव्यात की, अल्पभूधारक शेतकरी किंवा ज्यांचे औपचारिक शिक्षण कमी आहे, असे शेतकरीही सहजपणे हे व्यासपीठ समजू शकतील आणि वापरू शकतील. शेतकरी या पोर्टलचा आणि इतर डिजिटल साधनांचा वापर करण्यात सक्षम व्हावेत, यासाठी देशातील कृषी विज्ञान केंद्रांच्या माध्यमातून एक विशेष प्रशिक्षण मोहीम राबवली जात आहे.

हे संकेतस्थळ केवळ शेतकरीवर्गासाठी मर्यादित न राहता, कृषी उत्पादक संस्था, प्राथमिक कृषी कर्ज समित्या, कृषी शास्त्रज्ञ, संशोधक आणि स्टार्टअप्स आदि घटकांना एकत्र आणून एकमेकांना जोडण्याचे काम करणार आहे.

हे नवीन संकेतस्थळ MeitY च्या DBIM 3.0 आणि GIGW 3.0 मानकांचे पालन करून विकसित करण्यात आले आहे. हे अत्यंत सुरक्षित, मोबाईलवर वापरण्यास सोपे आणि दिव्यांग व्यक्तींसाठी पूर्णपणे सुलभ आहे. हे व्यासपीठ 'पीएम-किसान', 'ॲग्रीस्टॅक' आणि 'प्रधानमंत्री पिक विमा योजना' या सारख्या प्रमुख उपक्रमांसाठी एक 'सिंगल-विंडो' म्हणजे एकाच ठिकाणी सर्व सुविधा देणारे प्रवेशद्वार म्हणून काम करणार आहे.

या संकेतस्थळामुळे पारदर्शकता निर्माण होईल आणि मध्यस्थांची पूर्णपणे हकालपट्टी होणार आहे. ऑनलाइन पात्रता तपासणी, थेट अर्ज सादर करण्याची सुविधा आणि थेट बँक खात्यात आर्थिक मदत जमा करणे (डीबीटी) यासारख्या वैशिष्ट्यांमुळे प्रक्रिया अधिक पारदर्शक होते आणि मध्यस्थांची भूमिका पूर्णपणे संपते.

कमी इंटरनेट गतीवरही हे पोर्टल कार्यक्षम राहील याची काळजी घेतली गेली आहे. ग्रामीण भागाचा विचार करून तयार केलेले हे पोर्टल वापरण्यास सोपे आहे. हे साध्या स्मार्टफोनवर आणि जिथे नेटवर्क कमकुवत आहे, अशा ठिकाणीही सुरळीतपणे काम करते.

वेळेवर आणि अचूक माहिती हे पोर्टलचे वैशिष्ट्य आहे. शेतकऱ्यांना हवामानाची स्थिती, आधुनिक वैज्ञानिक शेती पद्धती, बियाणे व खतांची उपलब्धता आणि बाजारभाव याविषयी थेट आणि विश्वासार्ह माहिती मिळेल.

दिव्यांग व्यक्तींसाठी हे पोर्टल सुलभ करण्यात आले आहे. आधुनिक सरकारी मानकांनुसार विकसित केलेले हे पोर्टल दृष्टिहीन आणि दिव्यांग व्यक्तींसाठी वापरण्यायोग्य आहे. ते सहजपणे 'स्क्रीन रीडर' आणि सुलभ नेव्हिगेशनच्या माध्यमातून या संकेतस्थळाचा वापर करू शकतात.

माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमातून हे संकेतस्थळ शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणार आहे. पुढील काळात शेती आणि शेतकरी-शेतमजूर यांच्या उन्नतीसाठी हे प्रयत्न अधिक उपयुक्त ठरतील यात शंका नाही.

**अनिल आलुरकर,**
**उपसंचालक (माहिती),**
**विभागीय माहिती कार्यालय,**
**अमरावती.**

# भारतीय पौराणिक कथांकडे नव्या दृष्टिकोनातून पाहण्याची गरज - आनंद नीलकंठन

**मुंबई/वृत्तसंस्था:** भारतीय पौराणिक कथा आणि महाकाव्यांकडे केवळ पारंपरिक दृष्टिकोनातून न पाहता, त्यातील विविध पात्रांचे विचार, भूमिका आणि मानवी पैलू समजून घेणे महत्त्वाचे आहे. रामायण आणि महाभारतासारख्या महाकाव्यांमध्ये धर्म, कर्तव्य, कर्म आणि मानवी स्वभाव यांविषयी सखोल चिंतन मांडण्यात आले आहे. या कथांचा अभ्यास करताना प्रत्येक पात्राकडे वेगवेगळ्या दृष्टिकोनातून पाहण्याची संधी मिळते, असे प्रतिपादन प्रसिद्ध लेखक आनंद नीलकंठन यांनी केले.

मुंबई विद्यापीठाच्या कलिना परिसरात २४ ते २९ नोव्हेंबरदरम्यान आयोजित 'मुंबई पुस्तक महोत्सव २०२६'मध्ये 'भारतीय पौराणिक कथांची नव्याने मांडणी' या विषयावरील विशेष संवाद सत्रात ते बोलत होते. चित्रपट निर्मात्या श्वेता पड्डा यांनी त्यांच्याशी संवाद साधला. आनंद नीलकंठन हे कादंबरीकार, पटकथा लेखक आणि स्तंभलेखक म्हणून परिचित आहेत. भारतीय पौराणिक कथांमधील परिचित पात्रांचे वेगळ्या दृष्टिकोनातून चित्रण करणे ही त्यांच्या लेखनाची वैशिष्ट्यपूर्ण शैली आहे.

भारतीय पौराणिक कथांमध्ये पात्रांचे चित्रण केवळ नायक आणि खलनायक अशा ठरावीक चौकटीत करता येत नाही, असे सांगून नीलकंठन म्हणाले की, रामायण आणि महाभारतातील प्रत्येक पात्राला स्वतःची भूमिका, विचार आणि परिस्थिती आहे. एखाद्या पात्राच्या दृष्टिकोनातून संपूर्ण कथा समजून घेतल्यास तिचे वेगळे पैलू उलगडतात. रावण, दुर्योधन, सीता किंवा हनुमान यांसारख्या पात्रांकडे वेगवेगळ्या भूमिकांतून पाहण्याचा प्रयत्न आपल्या कथनाला नवे आयाम देतो.

लेखनप्रक्रियेविषयी बोलताना त्यांनी सांगितले की, एखाद्या पात्रावर लिहिताना लेखकाने त्या पात्राच्या विचारविश्वात प्रवेश करणे आवश्यक असते. त्या पात्राची भूमिका समजून घेताना त्याच्या भावना, परिस्थिती आणि निर्णय यांचा विचार करावा लागतो. त्यामुळे एकाच कथेकडे वेगवेगळ्या पात्रांच्या नजरेतून पाहिल्यास तिचे अनेक अर्थ समोर येतात.

रामायण आणि महाभारत ही केवळ युद्धकथा नसून धर्म, कर्तव्य आणि योग्य निर्णय घेण्यातील पेच यांवर विचार करायला लावणारी महाकाव्ये आहेत. अनेक प्रसंगांमध्ये पात्रांसमोर दोन वेगवेगळ्या कर्तव्यांमधून निवड करण्याचे आव्हान उभे राहते. अशा प्रसंगांमधून मानवी जीवनातील गुंतागुंत आणि निर्णयांचे परिणाम समजून घेता येतात, असे त्यांनी स्पष्ट केले.

भारतीय परंपरेत रामायणाच्या अनेक आवृत्त्या आणि कथनपरंपरा आढळतात. काळ, प्रदेश आणि स्थानिक संस्कृतीनुसार या कथांना वेगवेगळे संदर्भ लाभले आहेत. त्यामुळे विविध आवृत्त्यांचा अभ्यास करताना त्यांच्याकडे उत्सुकतेने आणि खुल्या मनाने पाहणे गरजेचे आहे, असेही नीलकंठन यांनी नमूद केले.

या संवादातून तरुण वाचकांना भारतीय महाकाव्यांचा आशय, त्यातील पात्रांचे विविध पैलू आणि कथाकथनातील सर्जनशील शक्यता यांची ओळख झाली. परंपरागत साहित्याकडे चिकित्सक, जिज्ञासू आणि व्यापक दृष्टिकोनातून पाहण्याची प्रेरणा या सत्राने दिली.

# टंचाई निवारण होणार सुकर



राज्यात 'एल-निनो'च्या प्रभावामुळे सरासरी-पेक्षा कमी पर्जन्यमान झाल्याने दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याची टंचाई आतापासूनच जाणवत आहे. आगामी काळात पाणीटंचाई अधिक तीव्र होण्याची शक्यता लक्षात घेऊन, टंचाईग्रस्त भागात तातडीने आणि प्रभावी उपाययोजना राबविण्यासाठी राज्य शासनाने पाणीपुरवठ्याच्या विविध उपाययोजनांच्या आर्थिक मर्यादेत वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्तांना विविध पाणीपुरवठा उपाययोजनांसाठी प्रशासकीय मंजुरी देताना वाढीव आर्थिक अधिकार उपलब्ध होणार असून, टंचाई निवारणाच्या कामांना गती मिळणार आहे. याविषयाची माहिती जाणून घेऊया.

पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने १८ नोव्हेंबर २०२६ रोजी जारी केलेल्या शासन निर्णयानुसार, ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याची टंचाई दूर करण्यासाठी यापूर्वी निश्चित करण्यात आलेल्या आर्थिक मर्यादांना ३० जून २०२७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर महसूल मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली गठित मंत्रिमंडळ उपसमितीच्या ४ नोव्हेंबर रोजी झालेल्या बैठकीत याबाबत निर्णय घेण्यात आला होता.

पाणीटंचाई निवारणासाठी क्षेत्रीय स्तरावर तातडीने निर्णय घेता यावेत आणि प्रशासकीय प्रक्रियेमुळे उपाययोजनांना विलंब होऊ नये, यासाठी शासना-ने जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्तांच्या आर्थिक अधिकारांमध्ये वाढ केली आहे. वाढीव आर्थिक मर्यादेमुळे टंचाईग्रस्त गावांमध्ये आवश्यक पाणीपुरवठा सुविधा निर्माण करणे, विद्यमान योजनांची दुरुस्ती करणे आणि पर्यायी व्यवस्था उभारणे अधिक सुलभ होणार आहे.

**तात्पुरत्या पूरक नळ योजनांना प्राधान्य**

पाणीटंचाईग्रस्त गावांमध्ये विद्यमान पाणीपुरवठा व्यवस्था अपुरी पडत असल्यास, तात्पुरत्या पूरक नळ पाणीपुरवठा योजना उभारण्याचा पर्याय उपलब्ध होणार आहे. अशा योजनांमुळे आवश्यक त्या ठिकाणी पर्यायी जलस्रोतांचा वापर करून पाणीपुरवठा व्यवस्था कार्यान्वित करता येईल. या योजनांसाठी जिल्हाधिकारी ४० लाख रुपयांपर्यंत, तर विभागीय आयुक्त १ कोटी रुपयांपर्यंत प्रशासकीय मंजुरी देऊ शकतील.

**नळ पाणीपुरवठा योजनांच्या दुरुस्तीला गती**

ग्रामीण भागातील अनेक गावांमध्ये पाणीपुरवठा योजना अस्तित्वात असल्या, तरी तांत्रिक बिघाड, पाइपलाइनमधील गळती, पंप यंत्रणेतील दोष किंवा अन्य कारणांमुळे पाणीपुरवठा विस्कळीत होतो. अशा योजनांची विशेष दुरुस्ती वेळेत झाल्यास उपलब्ध जलस्रोतांचा अधिक प्रभावी वापर करता येईल आणि गावांमधील पाणीटंचाई कमी करण्यास मदत होईल.

या विशेष दुरुस्ती कामांसाठी जिल्हाधिकाऱ्यांना ६० लाख रुपयांपर्यंत, तर विभागीय आयुक्तांना १ कोटी रुपयांपर्यंत आर्थिक मंजुरीचे अधिकार देण्यात आले आहेत. त्यामुळे तांत्रिक अडचणींमुळे बंद पडलेल्या किंवा अपुऱ्या क्षमतेने सुरू असलेल्या पाणीपुरवठा योजनांच्या दुरुस्तीला गती मिळणार आहे.

**टँकरसाठी हायड्रंटची व्यवस्था**

टंचाईग्रस्त भागात टँकरद्वारे पाणीपुरवठा करताना टँकर भरण्यासाठी योग्य ठिकाणी पाणी उपलब्ध असणे आवश्यक आहे. यासाठी पिण्याच्या पाण्याचे टँकर भरण्यासाठी आवश्यक तात्पुरत्या हायड्रंटची व्यवस्था करण्याची तरतूद शासनाने केली आहे. या उपाययोजनेसाठी जिल्हाधिकारी १ लाख रुपयांपर्यंत, तर विभागीय आयुक्त २ लाख रुपयांपर्यंत खर्चास मंजुरी देऊ शकतील. टँकर भरण्याची व्यवस्था सुलभ झाल्यास पाणी वितरण प्रक्रियेतील वेळ कमी होऊन टंचाईग्रस्त भागात पाणीपुरवठा अधिक नियमित करण्यास मदत होईल.

**बैलगाडीने पाणीपुरवठ्याचीही तरतूद**

दुर्गम भागातील वाड्या-वस्त्यांमध्ये, जेथे टँकर पोहोचणे कठीण आहे किंवा अन्य पर्याय उपलब्ध नाहीत, अशा ठिकाणी बैलगाडीने पाणीपुरवठा करण्याची उपाययोजनाही शासन निर्णयात कायम ठेवण्यात आली आहे. यासाठी प्रति दिन, प्रति बैलगाडी ३ हजार रुपयांपर्यंत आर्थिक मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. दुर्गम भागातील नागरिकांपर्यंत पिण्याचे पाणी पोहोचविण्यासाठी स्थानिक परिस्थितीनुसार या पर्यायाचा वापर करता येणार आहे.

**टंचाई निवारणाला बळ**

पाणीटंचाईच्या काळात नागरिकांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची अत्यंत महत्त्व-ाची जबाबदारी आहे. त्यासाठी केवळ दीर्घकालीन जलस्रोत निर्मितीच नव्हे, तर तात्पुरत्या उपाययोजना, विद्यमान योजनांची दुरुस्ती, टँकरद्वारे पाणीपुरवठा आणि दुर्गम भागांपर्यंत पाणी पोहोचविण्याची व्यवस्था यांचीही आवश्यकता असते. आर्थिक मर्यादेत वाढ केल्यामुळे क्षेत्रीय प्रशासनाला परिस्थितीनुसार अधिक तत्परतेने निर्णय घेता येणार आहे.

प्रशासकीय मंजुरीच्या प्रक्रियेत सुलभता निर्माण झाल्यामुळे टंचाईग्रस्त गावांमध्ये आवश्यक कामे वेळेत सुरू करण्यास मदत होईल. वाढीव आर्थिक अधिकारांचा प्रभावी वापर, पाणीपुरवठा यंत्रणांचे नियोजन आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी यांमधील समन्वयातून ग्रामीण भागातील नागरिकांना पाणीटंचाईच्या काळात दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.

**माहिती संकलन –**
**जिल्हा माहिती कार्यालय,**
**छत्रपती संभाजीनगर**

# दोन मित्र, पुन्हा एकत्र

पंजाबमध्ये पुढील वर्षी फेब्रुवारीत होणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप आणि शिरोमणी अकाली दल यांच्यात पुन्हा युती झाली आहे. सहा वर्षांपूर्वी तीन कृषी कायद्यांना विरोध करीत शिरोमणी अकाली दल राष्ट्रीय लोकशाही आघाडीतून बाहेर पडला होता. सहा वर्षांनंतर हे दोन्ही जुने मित्र एकत्र आल्याने पंजाबमधील आगामी निवडणुकीत सत्ताधारी आम आदमी पक्ष आणि प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या काँग्रेससमोर मोठे आव्हान उभे राहणार आहे. एकूणच त्या निवडणुकीत तिरंगी लढतीचे चित्र पाहायला मिळणार आहे. युतीची घोषणा करताना केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सावध पवित्रा घेत या नव्या युतीमध्ये अकाली दलच मोठा भाऊ असेल आणि मुख्यमंत्री त्यांचा होईल, असे म्हटले आहे. त्यांच्या या भूमिकेला २०१९ मध्ये




ग्रामीण भागात जो जनाधार नाही, तो अकाली दलाच्या सहकार्याने मिळू शकतो. शीख समाजाचा पाठिंबा मिळण्याच्या दृष्टीनेही ही युती आवश्यक होती. या युतीमुळे मतविभागणी टळून दोन्ही पक्षांना फायदा होऊ शकतो. २०२४ च्या निवडणुकीचा अनुभव लक्षात घेऊन काहीशा मजबुरीने दोन्ही पक्षांना एकत्र यावे लागते आहे. अर्थात कृषि कायद्यावरून दोन्ही पक्षांत यापूर्वी झालेल्या फारकतीनंतर आता मतदारांपर्यंत युतीचे समर्थन हे दोन्ही पक्ष कसे करणार आणि मतदारांना ते भावणार का? हा प्रश्न आहेच. आगामी विधानसभा निवडणूक अकाली दलाच्या अस्तित्वाची लढाई आहे. बादल कुटुंबाला पुन्हा सत्तेची आस आहे. भाजपची संघटनात्मक ताकद, पैसा आणि केंद्रातील यंत्रणेचा लाभ या निवडणुकीत मिळू शकतो. अकाली दल आणि भाजप यांच्या समर्थक मतदारांमुळे 'आप'ला या निवडणुकीत कडवी झुंज द्यावी लागेल. तथापि अकाली दल-भाजप एकत्र आल्याने शीख मते विभागली जाऊन त्याचा फायदा काँग्रेसला होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. निवडणूक जसजशी जवळ येईल, तसतशी जागावाटपाची सूत्रे आकार घेतील. भाजप अधिक जागांसाठी अडून बसल्यास जागावाटपात अडथळा येऊ शकतो. ज्या तीन कृषी कायद्यांवरून झालेल्या आंदोलनात ७०० शेतकर्यांचे बळी गेले त्या कायद्यावर असलेला शेतकर्यांचा रोष अद्याप कायम राहिला तर युतीमुळे फार काही साध्य होणार नाही. अर्थात पंजाबमधील जनता भावनिक मुद्द्यापेक्षा व्यावहारिक विचाराला अधिक महत्त्व देणारी आहे. पंजाबातील जनतेला अमली पदार्थापासून तरुणांची मुक्तता, बेरोजगारांना रोजगाराच्या संधी आणि शेतमालाला किमान हमी भाव यासारखे मुद्दे महत्त्वाचे वाटतात.

अमली पदार्थ माफीयांना अकाली दल-ाने संरक्षण दिल्याचे आरोप होताना तोच पक्ष अमली पदार्थमुक्तीचे आश्वासन देतो, यावर मतदार कितपत विश्वास ठेवतील? भाजप अकाली दलाची युती झाली; पण हे दोन्ही पक्ष पंजाबातील मतदारांची मने जिंकणार का? हा खरा प्रश्न आहे. जागा वाटपाचे अंतिम सूत्र, प्रत्येक मतदार संघातील उमेदवारांची जिंकण्याची क्षमता, शहरी विरुद्ध ग्रामीण मतदारांचा प्रभाव आणि दोन्ही पक्षाच्या केंद्रीय व राज्य नेतृत्वातील तडजोडी यावरच युतीचे निवडणुकीचे भवितव्य ठरेल.

शिवसेना आणि भाजप यांच्यातील मुख्यमंत्रिपदाच्या वादाची पार्श्वभूमी असावी. अर्थात सत्ता आल्यानंतरच्या या गोष्टी असल्या तरी एका मुख्यमंत्री पदाच्या बदल्यात दोन उपमुख्यमंत्रिपदे भाजप आपल्या पदरात पाडून घेण्याची शक्यता नाकारता येत नाही. खरे तर या दोन पक्षांतील ही युती नवीन नाही. १९९६ पासून हे दोन्ही पक्ष निवडणुका लढवीत आले आहेत आणि १९९७, २००० आणि २०१२ मध्ये या युतीने पंजाबात सत्ताही काबीज केली आहे. सहा वर्षांपूर्वी मोदी सरकारने आणलेल्या तीन कृषी कायद्यांच्या विरोधात अकाली दलाने भूमिका घेत २४ वर्षांची युती तोडली होती. मात्र एकमेकांपासून वेगळे होण्याची किंमत त्यांना विधानसभेतील पराभवातून चुकवावी लागली. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत अकाली दलाला केवळ एक जागा मिळाली तर १३ जागा लढवणार्या भाजपला एकही जागा जिंकता आली नव्हती. अकाली दल आणि भाजप यांच्या समर्थक मतदारांमुळे 'आप'ला या निवडणुकीत कडवी झुंज द्यावी लागेल. तथापि अकाली दल-भाजप एकत्र आल्याने शीख मते विभागली जाऊन त्याचा फायदा काँग्रेसला होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. युती फायदेशीर ठरेल का?

भाजप आणि अकाली दल एकत्र येणे ही त्या दोन्ही पक्षांच्या दृष्टीने अपरिहार्यता आहे. याचे कारण भाजपला

# बहुजन व स्त्री शिक्षणाचे आधारस्तंभ: महात्मा फुले

**स्मृती दिनानिमित्त विशेष**



भारताचे थोर सुपुत्र, विचारवंत, समाजसुधारक, लेखक महात्मा जोतीराव फुले यांचा आज स्मृतिदिन. महात्मा जोतीराव फुले यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी झाला. जोतीरावांच्या वडिलांचे नाव गोविंदराव तर आईचे नाव चिमणाबाई असे होते. सातारा जिल्ह्यातील कटगुण हे त्यांचे मूळ गाव. त्यांचे आडनाव गोऱ्हे असे होते पण त्यांच्या वडिलांचा फुले विक्रीचा व्यवसाय होता त्यामुळे ते फुले म्हणूनच ते ओळखले जाऊ लागले पुढे फुले हेच आडनाव रूढ झाले. काही दिवसांनी कटगुणहुन त्यांचे कुटुंबीय पुरंदर तालुक्यातील खानवडी येथे आले. खानवडी येथे त्यांचे घर असून त्यांच्या नावे सात बाराचा उतारा देखील आहे. प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी भाजी विक्रीचा व्यवसाय केला. जोतीराव फुले यांना लहानपणापासून शिक्षणाची आवड होती. १८४२ साली त्यांनी पुण्याच्या स्कॉटिश मिशन हायस्कूलमध्ये माध्यमिक शिक्षण घेण्यासाठी प्रवेश घेतला. अतिशय तल्लख बुद्धीच्या जोतिरावांनी पाच सहा वर्षातच तो अभ्यासक्रम पूर्ण केला. २३ सप्टेंबर १८७३ रोजी महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. तथाकथित सनातनी उच्चवर्णीय लोकांकडून सर्वसामान्य लोकांवर होणारा अन्याय अत्याचर दूर करणे तसेच गुलामगिरीतून शूद्रातिशूद्र समाजाची मुक्तता करणे व त्यांना त्यांच्या हक्काची जाणीव करुन देणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. 'सर्वसाक्षी जगतपती। त्याला नकोच मध्यस्ती।। ' हे या समाजाचे घोषवाक्य होते. सत्यशोधक समाजाने गुलामगिरीविरुद्ध आवाज उठवला आणि समाज न्यायाची व सामाजिक पुनर्रचनेची मागणी केली. या समाजातर्फे पुरोहितांशीवाय लग्न लावण्यास सुरवात केली. मराठीत मंगलाष्टके रचली. समाजातील तळागाळातील लोकांपर्यंत शिक्षण पोहचवणे हे सत्यशोधक समाजाचे महत्वाचे ध्येय होते. महात्मा फुले यांनी एका कवितेत शिक्षणाचे महत्व पटवून देताना म्हटले आहे की

विद्येविना मती गेली ।
मतिविना नीती गेली।
नितीविना गती गेली ।
गतिविना वित्त गेले ।
वित्ताविना शूद्र खचले ।
इतके अनर्थ एका अविद्येने केले ।।

एक महिला शिकली तर संपूर्ण कुटुंब शिकते. समाज शिक्षित करायचा असेल आणि बहुजन समाजात शिक्षण मुहूर्तमेढ रोवयची असेल तर महिलांना शिक्षित व्हायलाच हवे असे त्यांचे मत होणे म्हणूनच त्यांनी त्याची सुरवात स्वतःच्या घरापासून केली. जोतिरावांनी त्यांच्या पत्नी सावित्रीबाईंना शिक्षण देऊन शिक्षण कार्यास प्रवृत्त केले. महात्मा फुले यांनी १८४८ साली पुण्यातील भिडे वाड्यात मुलींची पहिली शाळा काढून तेथील शिक्षिकेची जबाबदारी सावित्रीबाईंवर सोपवली. पुढे सावित्रीबाई या शाळेच्या मुख्याध्यापिकापदी आरूढ झाल्या.शाळेच्या मुख्याध्यापकपदी आरूढ झालेली भारतातील पहिली महिला म्हणजे सावित्रीबाई फुले त्याचप्रमाणे मुलींसाठी पहिली शाळा काढणारे पहिले भारतीय म्हणजे महात्मा जोतीराव फुले. महात्मा जोतीराव फुलेंनी देशात मुलींच्या शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. आज सर्वच क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत असे कोणतेच क्षेत्र नाही की ज्यात महिलांनी आपला झेंडा रोवला नाही. कला, क्रीडा, साहित्य, विज्ञान, तंत्रदान, शिक्षण, समाजकारण, राजकारण, अर्थकारण अशा सर्वच क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत त्या केवळ आणि केवळ फुले दाम्पत्यांमुळे. महिलांसाठी फुले दाम्पत्यांनी जे कार्य केले ते ३३ कोटी देवांनीही केले नाही. महात्मा फुले यांनी पुण्यातील वेताळ पेठेत १८५२ साली अस्पृश्यांसाठी शाळा स्थापन केली. त्यांच्या या शैक्षणिक कार्याला सनातन्यांनी खूप वविरोध केला. मुलींनी शिक्षणासाठी घराबाहेर पडणे म्हणजे धर्म बुडणे अशी आरोळी ठोकत सनातनी लोकांनी महात्मा फुले यांच्या या महान कार्यास विरोध केला. त्यांना मारण्यासाठी मारेकरी पाठवले पण महात्मा फुले डगमगले नाहीत. ते आपल्या भूमिकेवर ठाम राहिले. महात्मा जोतीराव फुले यांना वाचनाची खूप आवड होती. विवीध महापुरुषांचे जीवनचरित्र वाचणे व त्यातून प्रेरणा घेणे हा त्यांचा आवडीचा छंद. छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र व थॉमस पेन या विचारवंतांच्या राईट ऑफ थॉट्स या ग्रंथाचा त्यांच्यावर खूप प्रभाव पडला. बहुजन समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा आणि दारिद्र्य पाहून ते खूप अस्वस्थ होत. जातपात, अस्पृश्य- स्पृश्य भेदभाव पाहून त्यांना खूप राग येत. समाजातील अज्ञान अंधश्रद्धा दूर करून समाजातील जातीभेद नष्ट करण्याचा त्यांनी निश्चय केला. कोणताही धर्म ईश्वराने निर्माण केलेला नाही आणि चातुर्वर्ण्य व जातीभेद ही निर्मिती मानवाचीच आहे असे त्यांचे रोखठोक मत होते. सर्व मानव एकच आहेत म्हणून सर्वांनी गुण्यागोविंदाने राहावे असे त्यांचे मत होते. त्यांनी लिहिलेल्या शेतकऱ्यांचा आसूड या पुस्तकातून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची विदारक दुर्दशा आणि दारिद्र्याची वास्तवता विशद केली आहे. या पुस्तकाद्वारे विशाल दृष्टिकोनाचे क्रांतिकारक म्हणून महात्मा फुलेंचे दर्शन होते. महात्मा फुले यांनी सार्वजनिक सत्यधर्म हा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ सत्यशोधक समाजाचा प्रमाण ग्रंथ मानला जातो. तुकारामांच्या अभांगाचा त्यांना गाढा अभ्यास होता. अभंगाच्या धर्तीवर त्यांनी अनेक अखंड रचले. त्यांना सामाजिक विषमतेचे जागतिक भान होते म्हणूनच आपला गुलामगिरी हा ग्रंथ त्यांनी अमेरिकेतील कृष्णवर्णीयांना समर्पित केला. अस्पृश्यांची कैफियत हा त्यांचा अप्रकाशित ग्रंथ आहे. २८ नोव्हेंबर १८९० रोजी महात्मा फुले यांचे निधन झाले. आज त्यांच्या स्मृतिदिनी त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे. महात्मा फुलेंना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

श्याम ठाणेदार दौंड जिल्हा पुणे,९९२२५४६२९५

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा

**डार्क चॉकलेट**–डार्क चॉकलेट निश्चित रूपानं तुमच्या त्वचेकरता लाभदायक आहे. कॉकोया फ्लावानोल सारख्या अँटीऑक्सीडेंट ने भरलेले असल्याने डार्क चॉकलेट तुमच्या त्वचेला हाइड्रेट ठेवते शिवाय साफ आणि स्वस्थ ठेवण्यात साहाय्यक आहे. कॉकोया तुमच्या त्वचेला मुलायम बनवतं आणि सोबतच चेहे-यावर सुरकुत्या सुध्दा लवकर येउ देत नाही परंतु तुम्ही याचे सेवन जास्त प्रमाणात करू नका रोज एका सिमीत मात्रेत याचे सेवन करणे निश्चितच तुमच्याकरता फायदयाचे राहील.



## २ Joke विनोद




बाबू – तुझे वडील किती वर्षाचे आहेत.
राजू – माझ्याच वयाचे आहेत.
बाबू – अरे पण हे कसं शक्य आहे.
राजू – का नाही शक्य? अरे मी जन्मलो, नि ते वडील बनले ना बस!

## ३ Message संदेश



Santa's Morning workout
santa 2 doctor-apne kaha tha ki subah khelne se se-hat thik rehti hai pr muje to koi fark nai pada?
doctor-konsa game khel-teho?
santa-mobile mai snake wala .

## ४ Thought सुविचार



ज्याला शत्रू नसतात त्याला अनुयायी देखील नसतात.
– डॉन प्याट

**संस्कृत सुभाषित**

रसान्तराण्येकरसं यथा दिव्यं पयोऽश्नुते।
देशे देशे गुणष्वेव मवस्थास्त्वमविक्रिय:।।

मराठीत अर्थ-आकाशातून पृथ्वीवर एकाच प्रकारचे पाणी पडते, पण जमिनीवरील निरनिराळ्या ठिकाणी निरनिराळे रस पाण्यात मिसळतात. तसेच निर्गुण आणि निराकार परमेश्वर पृथ्वीवर वेगवेगळ्या अवस्थांत दिसतो.

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. पुरा केलेला हिशोब, फेडलेला
४. सुखी माणसाचे वस्त्र
८. तीन पानांचे म्हणीतील झाड
१०. बोकड
१२. घाबरणे
१३. दशावतारातील त्रिविक्रम
१६. राजाचा कालावधी
१९. पौर्णिमा
२०. आजूबाजूला
२१. विषमच्या विरुद्ध
२३. मेघसारखा सावळा-श्रीकृष्ण
२५. घरातील मोठी माणसे
२७. चेहऱ्यावरील तेज
२९. युद्धात माघार न घेणारा वीर
३१. अवधान, लक्ष
३२. नवरदेव
३४. छत्रपतींचा शूर सेनापती-नेताजीचे आडनाव
३६. गरीब, निर्धन
३७. पार्वतीचे एक नाव, कजाग बाईचे विशेषण
३९. दणकट, भक्कम
४१. धन्यवाद
४२. प्रजा
४३. नक्की, खात्रीने
४४. स्पष्टवक्ता
४६. फाक, काप, तुकडा, ढीग
४८. ज्वाला, अग्नी
४९. काचेला आरसा करणारा
५०. इंग्रजीत धडा
५२. अभिनेता
५३. नम्र, वाकलेला
५५. भेदभाव
५८. ओढ्यावरील कच्चा पूल
६०. विदुराला हिणवताना केला जाणारा उल्लेख
६१. हवेतील शीतलता
६३. चीजवस्तू
६५. चकाकी
६६. जुळे
६८. हिंदीत दीर
६९. शिंका आणणारी तंबाखू
७०. दोऱ्याने सांधणारी
७१. कवाड
७२. गेरू
७३. सत्य
७४. सदोदित, वरचेवर
७७. दुसऱ्यावर केलेले उपकार
७९. हसतमुख
८०. पुष्कळ, वारेमाप
८२. नियमित यात्रेला जाणारा
८३. मत देणारा
८४. पाणी, रस

### उभे शब्द

१. झटक्यात, हा हा म्हणता
२. हात
३. शक्ती, बळ
५. औषध
६. नमस्कार
७. एक चतुर्थांश
८. पंख
९. एकूणात प्रमाण
१०. फुरसत, सवड
११. केसांची गुंतलेली बट
१४. चौक
१५. त्वरा, घाई
१७. जास्वंद
१८. या देशाच्या हरतऱ्हेच्या स्वस्त वस्तूंनी भारतीय बाजारपेठेवर अतिक्रमण केले आहे
२०. आश्रय, टेकू
२२. चाळीस शेर
२३. निवासस्थान
२४. काळसर
२५. अरण्य
२६. चटकन
२८. कष्ट, मेहनत
३०. रावणाची बहीण
३१. वजन
३३. लोखंडी वस्तू बनवणारा
३४. झाडाभोवतीचा कट्टा
३५. कारस्थान
३६. एक अप्सरा
३८. मातृभाषा
३९. पंकज
४०. वाळा
४१. सुस्ती, कंटाळा
४३. सहस्रवेळा
४४. पळून गेलेला
४५. पार्थिव
४६. आचारी
४७. झटकन
४९. पातक
५१. फायदा
५४. नेत्रसुखद, मनोहर
५५. आपलेपणा, ममता
५६. वार्ताहर
५७. डमरूच्या तालावर नाचणारे माकड
५९. श्रीकृष्णाचे वडील
६२. मुदतीचा करार
६३. वर्ष, सन
६४. भ्रम, जादू
६७. एक सुगंधी वनस्पती
६९. वाईट होण्यासंबधीच्या इच्छा, शाप
७०. पुत्र, मुलगा
७१. मध्यम प्रमाण
७२. व्यवस्था, काम
७३. पिकाचा गाळसाळ
७३अ. पाच शेरासाठी एक जुने मोजमाप
७५. वेषभूषेसह केलेली तालीम
७६. अमंगल, बीभात्स
७८. पान
७९. साद, बोलावणे
८१. आवाज, गोंगाट

### आडवे उत्तरे

१.चुकता ४.सदरा ८.पळस १०.अज १२.टरकणे १३.वामनावतार १६.राजवट १९.राका २०.आसपास २१.सम २३.घनश्याम २५.वडीलधारी २७.रया २९.रणशूर ३१.भान ३२.वर ३४.पालकर ३६.ट्रंक ३७.महामाया ३९.कणखर ४१.आभार ४२.रयत ४३.हमखास ४४.फटकळ ४६.खाक ४८.जाळ ४९.पारा ५०.लेसन ५२.नट ५३.लीन ५५.आपपरभाव ५८.साकव ६०.दासीपुत्र ६१.गारवा ६३.सामानसुमान ६५.लकाकी ६६.यमल ६८.देवर ६९.तपकीर ७१.दार ७२.काव ७३.सत ७४.वारंवार ७७.परोपकार ७९.हसरा ८०.भाराभर ८२.वारकरी ८३.मतदार ८४.द्रव

### उभे उत्तरे

१.चुटकीसरशी २.कर ३.ताकद ५.दवा ६.रामराम ७.पाव ८.पर ९.सरासरी १०.अवसर ११.जट १४.नाका १५.तातडी १७.जपा १८.चीन २०.आधार २२.मण २३.घर २४.शामल २५.वन २६.लवकर २८.यातायत ३०.शूर्पणखा ३१.भार ३३.लोहार ३४.पार ३५.कपट ३६.रंभा ३८.मायबोली ३९.कमळ ४०.खस ४१.आळस ४३.हजारदा ४४.फरार ४५.कलेवर ४६.खानसामा ४७.पटकन ४९.पाप ५१.नफा ५४.नयनरम्य ५५.अपुलकी ५६.पत्रकार ५७.भागाबाई ५९.वस-ुदेव ६२.वायदा ६३.सल ६४.माव ६७.मरवा ६९.तळपट ७०.सुत ७१.पासरी ७२.कारभार ७३.सरवा ७३अ.पासरी ७५.रंगीत ७६.अभद्र ७८.पर्ण ७९.हाक ८१.रव

# चंदेरी दुनिया

## छोट्या पडद्यावरून राष्ट्रीय पुरस्कारापर्यंत

# अभिनेत्री यामी गौतम यांचा प्रेरणादायी प्रवास



Birthday Special

यामी गौतम धर या हिंदी तसेच प्रादेशिक चित्रपटसृष्टीतील एक अत्यंत प्रतिभावान, आघाडीच्या आणि राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या भारतीय अभिनेत्री आहेत. दूरचित्रवाणी मालिकांपासून आपल्या प्रवासाची सुरुवात करून त्यांनी 'विकी डोनर', 'उरी: द सर्जिकल स्ट्राईक', 'बाला', 'ए थर्सडे', 'ओएमजी २' आणि 'आर्टिकल ३७०' यांसारख्या दर्जेदार चित्रपटांतून भारतीय सिनेसृष्टीत आपले अढळ स्थान निर्माण केले आहे. प्राथमिक माहिती व तक्तातपशीलमाहितीपूर्ण नावयामी गौतम धर (विवाहपूर्व: यामी गौतम)जन्म तारीख२८ नोव्हेंबर १९८८जन्मस्थानबिलासपूर, हिमाचल प्रदेश, भारतबालपण व शिक्षणचंदीगड, भारतव्यवसायअभिनेत्रीसक्रिय वर्षे२००८ – सध्यावडीलमुकेश गौतम (पंजाबी चित्रपट दिग्दर्शक)आईअंजली गौतमजोडीदारआदित्य धर (विवाह: ४ जून २०२१) अपत्यवेदाविद (जन्म: १० मे २०२४)प्रमुख सन्मानराष्ट्रीय चित्रपट पुरस्कार – सर्वोत्कृष्ट अभिनेत्री (आर्टिकल ३७०, २०२६)बालपण, कुटुंब व शिक्षण यामी गौतम यांचा जन्म २८ नोव्हेंबर १९८८ रोजी हिमाचल प्रदेशा-तील बिलासपूर येथे झाला, तर त्यांचे संपूर्ण बालपण आणि शालेय शिक्षण चंदीगड येथे पार पडले. त्यांचे वडील मुकेश गौतम हे प्रसिद्ध पंजाबी चित्रपट दिग्दर्शक आहेत आणि त्यांची आई अंजली गौतम गृहिणी आहेत. यामी यांना सुरीली गौतम नावाची धाकटी बहीण (जी स्वतः पंजाबी व हिंदी अभिनेत्री आहे) आणि ओजस गौतम नावाचा धाकटा भाऊ आहे. बालपणा-पासूनच यामी अभ्यासात अत्यंत हुशार होत्या आणि त्यांचे कुटुंब शिस्तप्रिय वातावरणाचे होते. सुरुवातीला त्यांचे स्वप्न भारतीय प्रशासकीय सेवेत (आयएएस) अधिकारी होण्याचे होते. शालेय शिक्षणानंतर त्यांनी चंदीगड येथील पंजाब विद्यापीठात विधी शाखेच्या पदवीसाठी (लॉ ऑनर्स) प्रवेश घेतला. मात्र, वयाच्या विसाव्या वर्षी अभिनयाची आवड जोपासण्यासाठी त्यांनी पूर्णवेळ शिक्षण थांबवून मुंबई गाठली आणि पुढे मुंबईतूनच आपली पदवीची वाटचाल सुरू ठेवली. वाचन, गृहसजावट आणि संगीत ऐकणे हे त्यांचे आवडते छंद आहेत. दूरचित्रवाणी व मॉडेलिंग कारकीर्द (२००८-२०१०) अभिनय क्षेत्रातील कारकिर्दीची सुरुवात यामी यांनी जाहिराती आणि दूरचित्रवाणी मालिकांमधून केली.चांद के पार चलो (२००८-२००९): या मालिकेतून त्यांनी छोट्या पडद्यावर पदार्पण केले आणि सना ही प्रमुख भूमिका साकारली. राजकुमार आर्यन (२००८): या ऐतिहासिक मालिकेत त्यांनी राजकुमारी भैरवीची भूमिका निभावली. ये प्यार ना होगा कम (२००९-२०१०): कलर्स वाहिनीवरील या लोकप्रिय मालिकेतील 'लेहर माथूर' या भूमिकेने त्यांना घराघरांत प्रचंड लोकप्रियता मिळवून दिली. इतर सहभाग: त्यांनी 'सीआयडी' मालिकेच्या एका भागात काम केले तसेच 'मिठी छुरी नंबर १' आणि 'किचन चॅम्पियन' यांसारख्या कार्यक्रमांतही सहभाग घेतला. यासोबतच त्यांनी अनेक नामांकित ब्रँड्सच्या जाहिरातींमध्ये काम करून आपली वेगळी ओळख निर्माण केली. चित्रपट कारकीर्द१. प्रादेशिक सिनेसृष्टीतून सुरुवात (२०१०-२०१२) हिंदी चित्रपटसृष्टीत येण्यापूर्वी यामी यांनी दक्षिण भारतीय आणि पंजाबी चित्रपटांत अभिनयाचा अनुभव घेतला:उल्लास उत्साह (२०१०): या कन्नड चित्रपटातून त्यांनी मोठ्या पडद्यावर पहिले पाऊल ठेवले. एक नूर (२०११) व नुव्विला (२०११): 'एक नूर' या पंजाबी चित्रपटात आणि 'नुव्विला' या तेलुगू रोमँटिक कॉमेडी चित्रपटात त्यांच्या अभिनयाचे कौतुक झाले. हिरो (२०१२), गौरवं (२०१३) व युद्धम (२०१४): पुढे त्यांनी 'हिरो' (मल्याळम), 'गौरवं' (तमिळ व तेलुगू द्विभाषिक), 'युद्धम' (तेलुगू), 'कुरिअर बॉय कल्याण' (तेलुगू) आणि 'तमिळसेल्वनम थनियार अंजलुम' (तमिळ) या चित्रपटांमध्ये काम केले. २. बॉलिवूड पदार्पण व सुरुवातीचा प्रवास (२०१२-२०१८)विकी डोनर (२०१२): दिग्दर्शक शूजित सरकार यांच्या या गाजलेल्या चित्रपटात आयुष्मान खुराना यांच्यासोबत यामी यांनी 'आशिमा रॉय' या बंगाली तरुणीची भूमिका साकारली. हा चित्रपट व्यावसायिक आणि समीक्षकांच्या दृष्टीने प्रचंड यशस्वी ठरला. या भूमिकेसाठी त्यांना सर्वोत्कृष्ट पदार्पण अभिनेत्रीचा झी सिने पुरस्कार आणि आयफा पुरस्कार मिळाला. टोटल सियापा व क्शन जॅक्सन (२०१४): या वर्षी त्यांनी 'टोटल सियापा' आणि प्रभुदेवा दिग्दर्शित 'क्शन जॅक्सन' या चित्रपटांत भूमिका केल्या. बदलापूर (२०१५): श्रीराम राघवन यांच्या या गंभीर थ्रिलर चित्रपटात वरुण धवन यांच्या पत्नीची (मिशा वर्मा) संवेदनशील भूमिका साकारून त्यांनी आपल्या अभिनयाची खोली दाखवून दिली. सनम रे व जुनूनियत (२०१६): पुलकित सम्राट यांच्यासोबतच्या या दोन्ही रोमँटिक चित्रपटांतील गाणी आणि त्यांची जोडी प्रेक्षकांच्या पसंतीस उतरली. काबिल (२०१७) व सरकार ३ (२०१७): 'काबिल' चित्रपटात हृतिक रोशन यांच्यासोबत दृष्टिहीन तरुणी 'सुप्रिया भटनागर'ची अत्यंत हळवी आणि प्रभावी भूमिका साकारली; हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर मोठा यशस्वी ठरला. त्याच वर्षी राम गोपाल वर्मा यांच्या 'सरकार ३' मध्ये त्यांनी अनु करकरे ही भूमिका साकारली. बत्ती गुल मीटर चालू (२०१८): या सामाजिक चित्रपटात त्यांनी वकील गु-लनार रिझवी यांची भूमिका निभावली. ३. कारकिर्दीतील सुवर्णकाळ व आशयघन भूमिका (२०१९-सध्या) २०१९ नंतर यामी गौतम यांनी केवळ पारंपरिक नायिकेच्या भूमिका न करता, कथानकाचा कणा असलेल्या आणि आव्हानात्मक भूमिका निवडण्यास सुरुवात केली:उरी: द सर्जिकल स्ट्राईक (२०१९): आदित्य धर दिग्दर्शित या ऐतिहासिक ब्लॉकबस्टर चित्रपटात त्यांनी गुप्तचर अधिकारी पल्लवी शर्मा / जास्मिन अल्मेडा यांची भूमिका साकारली. हा चित्रपट भारतीय सिनेसृष्टीतील सर्वाधिक यशस्वी चित्रपटांपैकी एक ठरला. बाला (२०१९): या उपहासात्मक विनोदी चित्रपटात त्यांनी 'परी मिश्रा' या टिकटॉक स्टारची विनोदी भूमिका इतकी चपखल साकारली की त्यांना सर्वोत्कृष्ट विनोदी कलाकाराचा 'स्क्रीन अवॉर्ड' मिळाला आणि अनेक पुरस्कारांसाठी नामांकने मिळाली. गिन्नी वेड्स सनी (२०२०) व भूत पोलीस (२०२१): ओटीटी माध्यमावर प्रदर्शित झालेल्या या दोन्ही चित्रपटांत त्यांनी अनुक्रमे सिमरन आणि माया या वेगळ्या धाटणीच्या भूमिका साकारल्या. ए थर्सडे (२०२२) व दसवी (२०२२): 'ए थर्सडे' या थ्रिलर चित्रपटात प्ले-स्कूल शिक्षिका 'नैना जयस्वाल' ही नकारात्मक छटा अस-लेली आणि अत्यंत गुंतागुंतीची भूमिका साकारून यामी यांनी समीक्षकांची मने जिंकली. तर 'दसवी' चित्रपटात त्यांनी कठोर आयपीएस अधिकारी ज्योती देसवाल यांची भूमिका उत्तम वठवली.



# २६ वर्षांनंतर 'धडकन २' येणार? अक्षय-शिल्पाच्या जागी दिसणार नवी जोडी!

२००० मध्ये प्रदर्शित झालेल्या 'धडकन' (ऊहरवज्ञरप) या सुपरहिट चित्रपटाचं नावही चर्चेत आलं आहे. अक्षय कुमार, सुनील शेट्टी आणि शिल्पा शेट्टी यांच्या सुपरहिट 'धडकन' चित्रपटाच्याही सीक्वेलची चर्चा सध्या सुरु आहे.ऊहरवज्ञरप २ : सध्या बॉलिवूडमध्ये अनेक गाजलेल्या चित्रपटांचे सिक्वेल आणि रिमेक बनवण्याचा ट्रेंड पाहायला मिळतोय. ९० च्या दशकातले काही हिट चित्रपटांचे सीक्वेल रिलीजही झाले. त्यातले काही चालले तर काही फ्लॉप झाले. याच यादीत आता २००० मध्ये प्रदर्शित झालेल्या 'धडकन' (ऊहरवज्ञरप) या सुपरहिट चित्रपटाचं नावही चर्चेत आलं आहे. अक्षय कुमार, सुनील शेट्टी आणि शिल्पा शेट्टी यांच्या सुपरहिट 'धडकन' चित्रपटाच्याही सीक्वेलची चर्चा सध्या सुरु आहे. तब्बल २६ वर्षांनंतर या चित्रपटाचा सिक्वेल प्रेक्षकांच्या भेटीला येणार असल्याचे बोलले जात आहे. २००० मध्ये प्रदर्शित झालेल्या या रोमँटिक चित्रपटातील गाणी आणि संवाद आजही प्रेक्षकांच्या स्मरणात आहे. सोशल मीडियावर तर यावर आजही मीम्सही बनवले जातात. मात्र सीक्वेलमध्ये अक्षय आणि शिल्पाच्या जागी फ्रेश जोडी दिसण्याची शक्यता आहे. मात्र, सुनील शेट्टी या चित्रपटात एका खास भूमिकेत दिसण्याची शक्यता आहे.'धडकन २' ची तयारी सुरू? चित्रपटाचे निर्माते 'धडकन २' या चित्रपटासाठी प्राथमिक स्तरावर चर्चा करत आहेत. मात्र, हा चित्रपट पहिल्या भागाची पुढची स्टोरी नसून पहिल्या चित्रपटाप्रमाणेच प्रेम, नातेसंबंध, भावनिक गुंतागुंत आणि विरह या विषयांभोवती नव्या चित्रपटाची कथा गुंफली जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रेक्षकांना जुन्या 'धडकन'ची आठवण करून देणारी, पण वेगळी स्टोरी या चित्रपटातून प्रेक्षकांना पाहायला मिळू शकते. २००० साली प्रदर्शित झालेल्या 'धडकन' या चित्रपटात अक्षय कुमारने राम, शिल्पा शेट्टीने अंजली, तर सुनील शेट्टीने देवची भूमिका साकारली होती. या तिघांच्या अभिनयाला आणि चित्रपटातील लव्हस्टोरीला प्रेक्षकांनी भरपूर पसंती दिली होती. मात्र, 'धडकन २' साठी निर्माते नव्या कलाकारांचा विचार करत असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे अक्षय कुमार आणि शिल्पा शेट्टी मुख्य भूमिकेत दिसण्याची शक्यता सध्या कमी आहे.
तर अभिनेता सुनील शेट्टीने साकारलेल्या देव ह्या व्यक्तिरेखेने प्रेक्षकांच्या मनात विशेष स्थान निर्माण केलं होतं. आता नव्या चित्रपटात त्याला कॅमिओ भूमिकेसाठी विचारण्यात आल्याचं समजतं. मात्र, त्याची भूमिका नेमकी काय असेल आणि कथेत त्याचं महत्त्व किती असेल, याबाबत अद्याप माहिती नाही. पहिल्या भागाचं दिग्दर्शन धर्मेश दर्शन यांनी केलं होतं. मात्र, दुसऱ्या भागासाठी नव्या दिग्दर्शकाच्या नावाची चर्चा सुरू आहे. 'टॉयलेट : एक प्रेम कथा' आणि 'बत्ती गुल मीटर चालू' यांसारख्या चित्रपटांचं दिग्दर्शन करणारे श्री नारायण सिंह यांच्याकडे ही जबाबदारी देण्यात येणार आहे. निर्माते आणि दिग्दर्शक यांच्यात यासंदर्भात प्राथमिक चर्चा सुरू असल्याची माहिती आहे. 'धडकन २' या चित्रपटासंदर्भात चर्चा अद्याप प्राथमिक टप्प्यात आहे. तर चित्रपटाची पटकथा आणि प्री-प्रॉडक्शनचं काम सुरुवातीच्या स्तरावर असल्याचं सांगितलं जातंय. मुख्य भूमिकांसाठी नव्या कलाकारांचा शोध सुरू असून, कास्टिंगबाबत अद्याप कोणताही अंतिम निर्णय झालेला नाही. दरम्यान, या चित्रपटाची अद्याप अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही.

28 Nov

# सौंदर्यवती ते अष्टपैलू अभिनेत्री: ईशा गुप्ता यांचा प्रेरणादायी जीवनप्रवास



Birthday Special

ईशा गुप्ता या हिंदी चित्रपटसृष्टीतील आणि दूरचित्रवाणी तसेच आंतरजाल माध्यमातील एक प्रसिद्ध भारतीय अभिनेत्री आणि छायाचित्र नमुना आहेत. २००७ मध्ये 'फेमिना भारतीय सुंदरी आंतरराष्ट्रीय' हा किताब जिंकल्यानंतर त्यांनी फॅशन क्षेत्रात नाव कमावले आणि २०१२ मध्ये 'जन्नत २' या चित्रपटातून अभिनयाची सुरुवात केली.प्राथमिक माहिती व तक्तातपशीलमाहितीपूर्ण नावईशा गुप्ताजन्म तारीख२८ नोव्हेंबर १९८५जन्मस्थाननवी दिल्ली, भारतव्यवसायअभिनेत्री, छायाचित्र नमुनासक्रिय वर्षे२०१२ – सध्याउंची१.७१ मीटर (५ फूट ७ १/२ इंच) प्रमुख किताबफेमिना भारतीय सुंदरी आंतरराष्ट्रीय (२००७) शिक्षणजनसंवाद पदवी (मणिपाल विद्यापीठ)बालपण, कुटुंब व शिक्षणईशा गुप्ता यांचा जन्म २८ नोव्हेंबर १९८५ रोजी नवी दिल्ली येथे झाला. त्यांचे वडील भारतीय हवाई दलातून निवृत्त झालेले अधिकारी आहेत, तर आई गृहिणी आहे. त्यांना नेहा नावाची एक बहीण आहे. वडिलांच्या नोकरीमुळे त्यांचे बालपण देहरादून, हैदराबाद आणि दिल्ली या शहरांमध्ये गेले. त्यांनी मणिपाल येथील मणिपाल विद्यापीठाच्या संवाद विद्यालयातून जनसंवाद विषयाची पदवी पूर्ण केली. सुरुवातीच्या काळात चित्रपट क्षेत्र त्यांची पहिली पसंती नव्हती, मात्र सौंदर्य स्पर्धा आणि फॅशन क्षेत्राच्या माध्यमातून त्या अभिनय क्षेत्राकडे वळल्या.सौंदर्य स्पर्धा व फॅशन क्षेत्रातील कारकीर्दफेमिना भारतीय सुंदरी २००७: ईशा यांनी २००७ मध्ये फेमिना भारतीय सुंदरी स्पर्धेत सहभाग घेतला. या स्पर्धेत त्या तिसऱ्या क्रमांकावर राहिल्या, 'उत्कृष्ट छायाचित्र चेहरा' हा पुरस्कार पटकावला आणि त्यांना 'भारतीय सुंदरी आंतरराष्ट्रीय' हा किताब मिळाला. पुढे त्यांनी 'आंतरराष्ट्रीय सुंदरी २००७' स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व केले.किंगफिशर दिनदर्शिका व जाहिरात क्षेत्र: २०१० मध्ये त्या प्रसिद्ध किंगफिशर दिनदर्शिकेत छायाचित्र नमुना म्हणून झळकल्या. फॅशन क्षेत्रातील यशाच्या जोरावर त्यांनी विविध फॅशन सोहळे, वस्त्रप्रदर्शन आणि विविध उत्पादनांच्या जाहिरातींमध्ये काम केले.चित्रपट व आंतरजाल मालिका कारकीर्दसुरुवातीचा काळ व यश (२०१२-२०१७)जन्नत २ (२०१२): इमरान हाश्मी यांच्यासोबत या गुन्हेगारी रहस्यपटामधून त्यांनी हिंदी चित्रपटसृष्टीत पदार्पण केले. या भूमिकेसाठी त्यांना सर्वोत्कृष्ट नवोदित अभिनेत्रीच्या फिल्मफेअर पुरस्कारासाठी नामांकन मिळाले.राझ त्रिमितीय व चक्रव्यूह (२०१२-२०१३): 'राझ त्रिमितीय' हा त्यांच्या कारकिर्दीतील व्यावसायिकदृष्ट्या यशस्वी ठरलेल्या भयपटांपैकी एक आहे. राजकीय कथानकावर आधारित 'चक्रव्यूह' मधील त्यांच्या भूमिकेचीही चर्चा झाली.हमशकल्स, रुस्तम, कमांडो २ व बादशाहो (२०१४-२०१७): त्यांनी 'हमशकल्स' मध्ये काम केले. 'रुस्तम' (२०१६) मध्ये प्रीती मखीजा यांची भूमिका साकारली, 'कमांडो २' (२०१७) मध्ये मारिया तथा विकी चड्ढा या भूमिकेत दिसल्या आणि 'बाद-शाहो' (२०१७) या चित्रपटातही त्या झळकल्या. याशिवाय 'बेबी' (२०१५) मधील गाण्यात त्या विशेष भूमिकेत दिसल्या. पुढील वाटचाल, दूरचित्रवाणी व आंतरजाल मालिका (२०१८ पुढे)प्रादेशिक चित्रपट व पलटण: त्यांनी द्विभाषिक 'वीदेवडू' चित्रपटाद्वारे तेलुगू व तमिळ चित्रपटसृष्टीत पाऊल ठेवले; तसेच 'विनाया विधेया रामा' (२०१९) मध्ये विशेष गाण्यात दिसल्या. २०१८ मध्ये 'पलटण' आणि २०१९ मध्ये 'टोटल धमाल' तसेच 'वन डे: न्याय मिळाला' मध्ये त्यांनी भूमिका केल्या.दूरचित्रवाणी व आंतरजाल माध्यमे: २०१८ मध्ये 'हाय फीव्हर – नृत्याचा नवा आविष्कार' या कार्यक्रमात त्या परीक्षक म्हणून दिसल्या. २०२० नंतर त्यांनी आंतरजाल माध्यमाकडे वळत 'रिजेक्टएक्स' (भाग २), 'नकाब' (२०२१) आणि 'आश्रम' (भाग ३, २०२२) या मालिकांमध्ये काम केले.वैयक्तिक आयुष्य व प्रसारमाध्यमातील प्रतिमाईशा गुप्ता समाजमाध्यमांवर सक्रिय असून आपल्या छायाचित्रांमुळे आणि स्पष्टवक्तेपणामुळे अनेकदा चर्चेत असतात. विविध मनोरंजन माध्यमांमध्ये त्यांच्या रूपरेषेची तुलना हॉलिवूड अभिनेत्री अँजेलिना जोली यांच्याशी केली जाते. टाइम्सच्या '५० सर्वाधिक पसंतीच्या स्त्रिया' या यादीतही (२०१७, २०१८, २०१९) त्या स्थान मिळवून राहिल्या आहेत.निवडक चित्रपट व मालिका सूचीजन्नत २ (२०१२)राझ त्रिमितीय (२०१२ / २०१३)चक्रव्यूह (२०१२)हमशकल्स (२०१४) – डॉ. शिवानी गुप्तारुस्तम (२०१६) – प्रीती मखीजाकमांडो २ (२०१७) – मारिया तथा विकी चड्ढाबादशाहो (२०१७)पलटण (२०१८)टोटल धमाल (२०१९) – प्राची मल्होत्रा / विशेष भूमिकाआश्रम (भाग ३) (२०२२)(टीप: उपलब्ध अधिकृत माहितीच्या आधारे हा तपशील तयार केला आहे; एखाद्या कलाकाराच्या कारकिर्दीतील सर्व नोंदी, गाणी आणि आगामी प्रकल्पांचा संपूर्ण कोष तयार करायचा असल्यास तो टप्प्याटप्प्याने वाढवता येईल.)

# एआयचा वापर मानवी क्षमतांना पूरक ठरावा, पर्याय नव्हे - प्रधान सचिव ब्रिजेश सिंह

## ➤ एआयच्या वापरात सुशासन, पारदर्शकता आणि मानवी हस्तक्षेप महत्वाचा असल्याचे प्रधान सचिव ब्रिजेश सिंह यांचे मत

**लातूर/जिमाका** : कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर करताना मानवी क्षमतांना पर्याय निर्माण करण्याऐवजी त्या अधिक सक्षम करण्यावर भर दिला पाहिजे. शासनाच्या निर्णय प्रक्रियेत एआयचा वापर सहाय्यक म्हणून व्हावा; मात्र महत्वपूर्ण निर्णय घेताना मानवी हस्तक्षेप आणि पडताळणी अनिवार्य असावी. एआयचा वापर सार्वजनिक हित, जबाबदारी आणि सुशासनाच्या तत्वांवर आधारित असणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन माहिती व जनसंपर्क विभागाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी केले.

हॉटेल आयटीसी ग्रँड सेंट्रल, परळ येथे आयोजित 'एआय ट्रान्सफॉर्मेशन कॉन्क्लेव्ह'मध्ये ते बोलत होते. यावेळी मुख्यमंत्र्यांचे आर्थिक सल्लागार तथा 'मित्रा'चे सीईओ प्रवीण परदेशी, सर्विस नाऊच्या वरिष्ठ संचालक गरिमा बब्बर, ओपन टेक्स्टचे देश संचालक मनीष बलूजा, डेलॉइट इंडियाचे पार्टनर जय गुहा, गव्हकनेक्टचे संचालक फहीम हक तसेच केंद्र व राज्य शासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

शासनाच्या कामकाजात एआयच्या वापराचे महत्व स्पष्ट करताना प्रधान सचिव ब्रिजेश सिंह यांनी महाराष्ट्र शासनाच्या 'महा एआय' या स्थानिक पातळीवर होस्ट केलेल्या सर्वम मॉडेलचा अनुभव सांगितला. मसुदा तयार करताना या मॉडेलची मदत घेतली. शासन निर्णय, पूर्वीचे संदर्भ, प्रशासकीय तरतुदी, खर्चाच्या मर्यादा आणि विविध भाषांमधील जनसंपर्काचे स्वरूप यांची माहिती उपलब्ध असल्यामुळे या प्रणालीने उपयुक्त मसुदा तयार करून दिला. त्यामुळे प्रशासकीय अधिकाऱ्यांना संदर्भ शोधणे आणि प्राथमिक मसुदा तयार करणे अधिक सुलभ होऊ शकते. तथापि, अंतिम मसुद्याची पडताळणी आणि मान्यता ही अधिकाऱ्यांनीच करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

डिजिटायझेशनपासून डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चरपर्यंतच्या भारताच्या प्रवासाचा उल्लेख करताना त्यांनी आधार, यूपीआय आणि डिजीयात्रा यांसारख्या सुविधांचे उदाहरण दिले. देशाने उभारलेली




डिजिटल सार्वजनिक पायाभूत व्यवस्था ही जागतिक स्तरावर आदर्श ठरली असून, आता त्यावर संमती आधारित व्यवस्था आणि एआय सक्षम व्यवहार प्रणाली विकसित करण्याची संधी भारतासमोर असल्याचे त्यांनी सांगितले.

एआयमुळे रोजगाराच्या संधी कमी होण्याबाबत भूमिका मांडताना ब्रिजेश सिंह म्हणाले की, भारतासारख्या मोठ्या लोकसंख्येच्या देशात मानवी श्रम आणि कौशल्यांना महत्व आहे. 'डार्क फॅक्टरी' किंवा चालकविरहित वाहनांसारख्या संकल्पनांचा स्वीकार करताना देशाच्या सामाजिक आणि आर्थिक गरजांचा विचार करणे आवश्यक आहे. एआयने माणसाची जागा घेण्याऐवजी त्याच्या कामाची गुणवत्ता, कार्यक्षमता आणि निर्णयक्षमता वाढविण्यास मदत केली पाहिजे.

एआयच्या वापरातील संभाव्य धोके स्पष्ट करताना त्यांनी ऑस्ट्रेलियातील 'रोबोडेब्ट' प्रकरणाचा उल्लेख केला. कल्याणकारी योजनांमधील लाभार्थ्यांची स्वयंचलित पडताळणी करताना एआय प्रणालीतील त्रुटींमुळे चुकीच्या नोटिसा पाठविण्यात आल्या आणि अखेर ही प्रक्रिया बंद करावी लागली. त्यामुळे महत्वपूर्ण शासकीय निर्णय पूर्णपणे एआयवर सोपविणे धोकादायक ठरू शकते. एआयने दिलेल्या निष्कर्षांची मानवी स्तरावर पडताळणी करूनच निर्णय घेणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले.

महाराष्ट्रात सुरू असलेल्या 'महा क्राइम ओएस' या प्रायोगिक उपक्रमाची माहिती देताना त्यांनी सांगितले की, गुन्हेगारीच्या घटनांमध्ये विशिष्ट पद्धती आणि प्रवृत्ती आढळतात. वाहनचोरी, घरफोडी, पाकीटमारी यांसारख्या गुन्ह्यांच्या कार्यपद्धतींचे विश्लेषण एआयच्या मदतीने करता येऊ शकते. या प्रणालीद्वारे विचारलेल्या प्रश्नांना माहितीच्या आधारे उत्तरे मिळू शकतात. मात्र, त्यांची सत्यता तपासून पुढील जबाबदार निर्णय घेण्याची भूमिका मानवी अधिकाऱ्यांचीच असेल.

शासकीय यंत्रणांमध्ये एआयचा वापर करताना त्याची खरेदी, स्वदेशी अथवा परदेशी तंत्रज्ञानाची निवड, स्वतः प्रणाली विकसित करणे की उपलब्ध प्रणाली स्वीकारणे, संगणकीय क्षमता आणि संसाधनांचे योग्य नियोजन या बाबींचा जोखमीच्या दृष्टिकोनातून विचार करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले.

भाषणाचा शेवट करताना ब्रिजेश सिंह म्हणाले, 'एआयचा वापर जबाबदारीने, जोखमींचे मूल्यमापन करून आणि सार्वजनिक हिताला केंद्रस्थानी ठेवून करणे, हाच एआय सुशासनाचा मूलमंत्र आहे'.

# 'सेवा दूत अभियाना'द्वारे लोककल्याणकारी योजना तळागाळापर्यंत पोहोचवा– प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी** : भारतीय जनता पार्टीच्या वतीने १ ते २५ डिसेंबर २०२६ या कालावधीत देशभरात 'सेवा दूत अभियान' राबविण्यात येणार आहे. या अभियानाच्या पूर्वतयारीसाठी छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित मराठवाडा विभागीय कार्यशाळेला भाजप महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी उपस्थित राहून पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.



या कार्यशाळेत अभियानाचे सूक्ष्म नियोजन, कार्यपद्धती आणि प्रभावी अंमलबजावणी यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी बोलताना रविंद्र चव्हाण यांनी असे आवाहन केले की, समाजातील विविध घटकांपर्यंत पोहोचून त्यांच्या अडीअडचणी व समस्या जाणून घेणे, त्यांना आवश्यक ते सहकार्य करणे आणि सरकारच्या लोककल्याणकारी योजनांची माहिती सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचविणे, हे या अभियानाचे मुख्य उद्दिष्ट आहे. हे अभियान यशस्वी करण्यासाठी सर्वांनी परस्पर समन्वयाने काम करावे.

या विभागीय कार्यशाळेस भाजपाचे राष्ट्रीय सहसंघटनमंत्री शिवप्रकाशजी, खासदार डॉ. भागवत कराड, प्रदेश सरचिटणीस सुनील राणे, आमदार विक्रांत पाटील, माजी आमदार संजय केनेकर यांच्यासह मराठवाडा विभागातील सर्व जिल्हाध्यक्ष, प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुख्यमंत्री सहायता निधी आता सोशल स्टॉक एक्सचेंजवर

## >> गरजू रुग्णांसाठी निधी उभारणीला मिळणार नवे व्यासपीठ

## >> वैद्यकीय उपचारांसाठी अधिक निधी उपलब्ध होण्यास मदत होण्याची अपेक्षा

**लातूर/जिमाका** :

आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि गंभीर आजारांनी ग्रस्त असलेल्या रुग्णांना उपचारांसाठी आर्थिक मदत मिळावी, या उद्देशाने कार्यरत असलेल्या मुख्यमंत्री सहायता निधीच्या कामकाजाला आता सोशल स्टॉक एक्स्चेंजच्या माध्यमातून नवी दिशा मिळू शकते. सोशल स्टॉक एक्स्चेंज हे सामाजिक आणि लोककल्याणकारी कामांसाठी निधी उभारणीचे नियमबद्ध व्यासपीठ आहे. या माध्यमातून सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या पात्र संस्था आणि देणगीदार यांच्यात समन्वय साधता येतो. राज्यातील दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर या नव्या व्यासपीठाद्वारे मिळणाऱ्या अतिरिक्त मदतीचा लाभ राज्यातील आरोग्य व्यवस्था बळकट करण्यासाठी होणार आहे.

महाराष्ट्रात मुख्यमंत्री सहायता निधीच्या माध्यमातून हृदयरोग, कर्करोग, किडनी विकार, यकृतविकार, मेंदूविकार तसेच अन्य गंभीर आजारांनी ग्रस्त रुग्णांना आर्थिक मदत दिली जाते. मात्र गेल्या काही वर्षात मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाकडे मदत मिळावी यासाठी अर्ज करणाऱ्या रुग्णांची संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. सोशल स्टॉक एक्स्चेंजमुळे अशा निधी उभारणीला व्यापक स्वरूप मिळण्याची शक्यता आहे.

### सोशल स्टॉक एक्स्चेंज म्हणजे नेमके काय?

सामान्य शेअर बाजारात कंपन्यांचे शेअर्स खरेदी-विक्री केले जातात. मात्र सोशल स्टॉक एक्स्चेंजमध्ये सामाजिक आणि लोककल्याणकारी कामांसाठी निधी उभारणी केली जाते. राष्ट्रीय शेअर बाजार (एनएसई) आणि बॉम्बे स्टॉक एक्स्चेंज (बीएसई) येथे सेबीच्या (एसईबीआय) नियमनाखाली हे व्यासपीठ उपलब्ध आहे.

पात्र ना-नफा संस्था या व्यासपीठावर नोंदणी करून झिरो कूपन झिरो प्रिन्सिपल या माध्यमातून निधी उभारू शकतात. या माध्यमातून देणगीदारांना सामाजिक कामांसाठी योगदान देण्याची संधी मिळते.



मुख्यमंत्री सहायता निधीला काय फायदा होणार?

निधी उभारणीची नवीन संधी: सामाजिक उपक्रमांसाठी देणग्या व गुंतवणुकीच्या माध्यमातून निधी मिळविण्याचा पर्याय उपलब्ध होतो.

मोठ्या देणगीदारांपर्यंत पोहोचणे शक्य: कंपन्यांच्या सामाजिक दायित्व (कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी) निधीचा वापर सामाजिक कामांसाठी करण्याचा मार्ग उपलब्ध होऊ शकतो. विशेषतः वैद्यकीय उपचारांसाठी मोठ्या निधीची गरज असलेल्या रुग्णांना याचा फायदा होण्याची अपेक्षा आहे. तसेच कर्करोग, हृदयरोग, किडनी प्रत्यारोपण, यकृत प्रत्यारोपण, मेंदूविकार आणि दुर्मिळ आजारांनी ग्रस्त रुग्णांसाठी अतिरिक्त निधी उभारण्यास मदत होऊ शकते. सीएसआर फंड देणाऱ्या कंपन्या, मोठे देणगीदार, फाउंडेशन, सामाजिक गुंतवणूकदार आणि इतर निधी पुरवठादार यांच्यापर्यंत पोहोचता येते.

नवीन देणगीदारांचा सहभाग: संस्थेच्या कार्याची माहिती व्यापक स्तरावर पोहोचल्यामुळे नवीन देणगीदार आणि सामाजिक क्षेत्रातील भागीदार मिळण्याची शक्यता वाढते. सामाजिक परिणाम मोजण्याची संधी: संस्थेने केलेल्या कामाचा लाभ किती लोकांपर्यंत पोहोचला, किती कुटुंबांचे जीवनमान सुधारले आणि किती सकारात्मक बदल घडले, हे मोजता येते.

महाराष्ट्रात आधीच सुरू आहेत निधी उभारणीचे प्रयत्न

मुख्यमंत्री सहायता निधीच्या माध्यमातून कॉर्पोरेट कंपन्या आणि रुग्णालयांच्या सहभागातून त्रिपक्षीय निधी उभारणी तसेच स्वयंसेवी संस्थांसोबत सामंजस्य करार अशा उपक्रमांवर काम सुरू आहे. याशिवाय गंभीर आजारांनी ग्रस्त रुग्णांसाठी अतिरिक्त आर्थिक स्रोत उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र पब्लिक रिलीफ सोसायटी स्थापन करण्यात आली आहे.

### गरजू रुग्णांसाठी मोठी संधी

मुख्यमंत्री सहायता निधीचा मुख्य उद्देश आर्थिक अडचणींमुळे कोणत्याही गरजू रुग्णाचे उपचार थांबवू नयेत हा आहे. सोशल स्टॉक एक्स्चेंजसारख्या निधी उभारणीच्या माध्यमातून सामाजिक सहभाग वाढविणे आणि कॉर्पोरेट क्षेत्राला जोडणे शक्य होणार आहे.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार मुख्यमंत्री सहायता निधीची नुकतीच नोंदणी आता सोशल स्टॉक एक्स्चेंजवर करण्यात आली आहे. त्यामुळे राज्यातील दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर याद्वारे मिळणाऱ्या अतिरिक्त मदतीचा लाभ दुष्काळग्रस्त भागातील आरोग्य व्यवस्था बळकट करण्यासाठी होणार आहे. येत्या काळात दुर्मिळ, महागड्या आणि अत्याधुनिक शस्त्रक्रिया करण्यासाठी लागणाऱ्या खर्चाच्या प्रस्तावांची नोंदणी आता या नव्या व्यासपीठावर करण्यात येणार आहे. तसेच त्यामुळे अधिक कॉर्पोरेट कंपन्यांचा सहभाग वाढणार आहे, असे मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे कक्षप्रमुख रामेश्वर नाईक यांनी सांगितले.

# पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या पाठपुराव्यामुळे लातूर जिल्हा रुग्णालयाचे १०० वरून ३०० खाटांचे श्रेणीवर्धन

**लातूर/प्रतिनिधी** : राज्यातील सार्वजनिक आरोग्य सेवा अधिक सक्षम व सर्वसमावेशक करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत सन २०२६-२०३१ या कालावधीत 'प्रगती' हा प्रकल्प राबविण्यात येणार आहे. त्यासाठी आशियाई विकास बँकेकडून (एडीबी) कर्ज घेण्यास व आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यास शासनाने १५ सप्टेंबर २०२६ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे मान्यता दिली आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांतर्गत लातूर जिल्हा रुग्णालयाचे १०० खाटांवरून ३०० खाटांचे श्रेणीवर्धन करण्यास मंजुरी मिळाली आहे.

लातूर जिल्हा रुग्णालयाच्या इमारतीच्या भूमिपूजन प्रसंगी पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी रुग्णालयातील खाटांची संख्या वाढवून घेतली जाईल, असा शब्द दिला होता. दिलेला हा शब्द पाळत त्यांनी याबाबत राज्य शासनाकडे सातत्यपूर्ण पाठपुरावा केला. त्यांच्या पाठपुराव्याला यश आले असून लातूर जिल्हा रुग्णालयाची क्षमता १०० खाटांवरून थेट ३०० खाटांपर्यंत वाढविण्यात आली आहे. या शासन निर्णयानुसार लातूर येथील १०० वरून ३०० खाटांच्या श्रेणीवर्धित जिल्हा रुग्णालयासाठी २३५ नवीन पदे निर्माण करण्यात येणार आहेत, पूर्वीची २१० पदे अस्तित्वात आहेत. त्यामुळे रुग्णालयाचा एकूण आकृतिबंध ४४५ होणार आहे.

लातूर जिल्हा रुग्णालयाच्या खाटांची संख्या वाढवून श्रेणीवर्धन करण्याचा महत्त्वपूर्ण. निर्णय घेतल्याबद्दल पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार आणि सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांचे आभार मानले आहेत. या निर्णयामुळे लातूर जिल्ह्यातील नागरिकांना अधिक दर्जेदार व अद्ययावत द्वितीय स्तरावरील आरोग्य सेवा स्थानिक पातळीवरच उपलब्ध होण्यास मोठी मदत होणार आहे.

लातूर जिल्हा रुग्णालयांचा प्रश्न काही तांत्रिक कारणांमुळे काही वर्षे प्रलंबित होता. पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी पालकमंत्री म्हणून जबाबदारी स्वीकारल्यानंतर हा प्रश्न सोडविण्यासाठी नियमित पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नातून जिल्हा रुग्णालयाचा



प्रश्न मार्गी लागला आणि लातूर येथे १०० खाटांच्या रुग्णालयाचे भूमिपूजन झाले होते. या भूमिपूजन कार्यक्रमातच त्यांनी जिल्हा रुग्णालयातील खाटांची संख्या वाढविण्यासाठी पाठपुरावा करण्याची ग्वाही दिली होती. त्यानुसार केलेल्या पाठपुराव्याला यश आले असून आता लातूर जिल्हा रुग्णालयाचे १०० खाटांवरून ३०० खाटांचे श्रेणीवर्धन करण्यास मंजुरी दिली आहे.

# युवा महोत्सवात दयानंद वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयाची दिमाखदार कामगिरी!

**लातूर/प्रतिनिधी** : जिल्हा क्रीडा कार्यालय, लातूर यांच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय युवा महोत्सवात दयानंद वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले.

या स्पर्धा दयानंद सभागृहामध्ये नुकत्याच पार पडल्या. यामध्ये काव्यलेखन स्पर्धेत प्रथम तीनही पारितोषिके पटकावत महाविद्यालयाने आपले वर्चस्व सिद्ध केले. यामध्ये प्रथम पारितोषिक नीरज कंदले, द्वितीय पारितोषिक ओंकार राठोड, तर तृतीय पारितोषिक शिवाली इसाके हिने मिळविले.

तसेच पथनाट्य स्पर्धेत द्वितीय पारितोषिक, तर समूह लोकगीत स्पर्धेत तृतीय पारितोषिक मिळवून महाविद्यालयाने यशाची परंपरा कायम राखली.

विशेष म्हणजे, काव्यलेखन स्पर्धेतील प्रथम तीनही पारितोषिकांवर दयानंद वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आपले नाव कोरले.

विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या यशाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष तथा



शालेय समिती अध्यक्ष श्री. रमेशकुमार राठी, सचिव श्री. रमेश बियाणी, संयुक्त सचिव श्री. विशाल लाहोटी, कोषाध्यक्ष श्री. संजय बोरा, शालेय समिती सदस्य श्री.बालकिशन बांगड, श्री. दिनेश इन्नानी, श्री.विशाल अग्रवाल व श्री. आशिष अग्रवाल यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे विशेष अभिनंदन केले.

तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर, उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने, कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रशासकीय अधिकारी प्रा. ऋतुजा देशमुख, समन्वयक डॉ. सुभाष मोरे, सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. सोनाली सास्तुरकर, प्रा. ज्योतिबा बडे व सर्व प्राध्यापकवृंद यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



# २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या वीर जवानांना सामूहिक अभिवादन



**अहमदपूर/प्रतिनिधी** : मुंबईवरील २६ नोव्हेंबर २००८ रोजी झालेल्या भीषण दहशतवादी हल्ल्यात देशाच्या रक्षणासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या शूरवीर जवानांना प्रतीवर्षा पासून याही वर्षी सम्राट मित्र मंडळाच्या वतीने सामूहिक अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी शहीद जवानांच्या छायाचित्रांना पुष्पहार अर्पण करून तसेच मेणबत्त्या प्रज्वलित करून त्यांच्या पवित्र स्मृतींना विनम्र अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमास विद्रोही कवी राजेंद्र कांबळे, संपादक अविनाशजी,भगवानराव ससाणे आदी मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी कार्यक्रमाचे संयोजक युवकनेते डॉ. सिध्दार्थकुमार सूर्यवंशी यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की,२६/११ चा दहशतवादी हल्ला हा केवळ मुंबईवर झालेला हल्ला नव्हता, तर तो भारताच्या सार्वभौमत्वावर, एकात्मतेवर आणि राष्ट्रीय अस्मितेवर झालेला थेट आघात होता.या हल्ल्यातील अजमल कसाब या दहशतवाद्याला जिवंत पकडण्यात भारतीय सुरक्षा यंत्रणांना आलेले यश हे आंतरराष्ट्रीय स्तरावर पाकिस्तानच्या दहशतवादी कारवायांचा पर्दाफाश करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरले.

देशाच्या सुरक्षेसाठी आपल्या प्राणांची पर्वा न करता लढणाऱ्या वीर जवानांच्या शौर्याचा आणि बलिदानाचा प्रत्येक भारतीयाने सदैव आदर केला पाहिजे. शहीद जवानांप्रती कृतज्ञता व्यक्त करणे हे आपले राष्ट्रीय कर्तव्य आहे. केवळ स्मरणदिनापुरते मर्यादित न राहता प्रत्येक भारतीयाने अशा कार्यक्रमांचे आयोजन करून देशभक्ती, राष्ट्रीय एकात्मता आणि शहीद जवानांच्या बलिदानाची जाणीव नव्या पिढीपर्यंत पोहोचवली पाहिजे, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

या अभिवादन कार्यक्रमास मित्रमंडळाचे शहराध्यक्ष बजरंग गायकवाड,बालाजी ढवळे,सामाजिक कार्यकर्ते रवी बनसोडे, सचिन बानाटे, आकाश पवार यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लातूरमध्ये बालभारतीचा हीरक महोत्सवी उद्घाटन सोहळा उत्साहात

## ➤ १९६७ ते १९९० च्या दशकांतील जुनी पाठ्यपुस्तके पुन्हा वाचकांच्या भेटीला

**लातूर/जिमाका** : महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती) यांच्या लातूर विभागीय भांडारातर्फे हीरक महोत्सवी वर्ष (२०२६-२७) विशेष उद्घाटन सोहळा आज एमआयडीसी येथील पाठ्यपुस्तक भांडार व वितरण केंद्रात मोठ्या उत्साहात पार पडला.

बालभारतीच्या ६० व्या वर्षपूर्तीनिमित्त आयोजित या सोहळ्यात १९६७, १९८० आणि १९९० च्या दशकांतील जुन्या पाठ्यपुस्तकांच्या पुनर्मुद्रित आवृत्तीचे आणि पुस्तक प्रदर्शनाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

सोहळ्याच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना पाठ्यपुस्तक मंडळाच्या वित्त व लेखाधिकारी श्रीमती शुभांगी माने म्हणाल्या, ''कृत्रिम बुद्धिमत्तेकडे (एआय) माहिती आणि ज्ञान असू शकते; पण तिच्याकडे भावना आणि माणुसपण नाही. मोबाईलवर सहज मिळणारी प्रत्येक माहिती खरी असेलच असे नाही. त्यामुळे एआयच्या युगातही पुस्तकेच माणसाची खरी सोबती आणि गुरू आहेत.'' जुन्या पाठ्यपुस्तकांच्या पुनर्मुद्रणामुळे जुन्या पिढीच्या आठवणी ताज्या होतील आणि नवी पिढी पुस्तकांशी जोडली जाईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

यावेळी पाठ्यपुस्तक मंडळाच्या संचालक अनुराधा ओक यांचा शुभेच्छा संदेश वाचून दाखवण्यात आला. २७ जानेवारी १९६७ रोजी रोवलेले बालभारतीचे रोपटे आज वटवृक्ष झाले असून, आधुनिक तंत्रज्ञान आणि भारतीय संस्कृतीची सांगड घालत ज्ञानदानाचे कार्य अखंड सुरू राहील, असे त्यांनी संदेशात नमूद केले.

**जिज्ञासा आणि कला शिक्षणाचे महत्त्व**

सुकाणू समितीचे सदस्य डॉ. अजय महाजन यांनी श्रीकृष्णाच्या कथेचा दाखला देत राष्ट्रीय शिक्षण धोरणाचे महत्त्व समजावून सांगितले. पाठ्यपुस्तके केवळ परीक्षेसाठी नसून ती विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा निर्माण करतात. 'भारत को जानो, भारत को मानो और भारतीय बनो' हा संदेश पाठ्यपुस्तकांतील प्रतिज्ञेतून मिळतो,



असे ते म्हणाले.

**वाचन संस्कृती टिकवण्याचे आवाहन**

इतिहास समितीचे सदस्य डॉ. सोमनाथ रोडे म्हणाले, स्थापनेपासून मिळालेल्या स्वायत्ततेमुळेच बालभारतीचा दर्जा टिकून आहे. पाठ्यपुस्तकांसोबतच छत्रपती शिवाजी महाराज आणि राजर्षी शाहू महाराज यांचे स्मृतीग्रंथ, शब्दकोश व 'किशोर' मासिकाच्या माध्यमातून संस्थेने मोठे साहित्यिक योगदान दिले आहे. आज मोबाईलमुळे वाचन संस्कृती कमी होत असून, ती टिकवण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

कला शिक्षण समितीचे अध्यक्ष शशिकांत देशमुख यांनी संगीत, चित्रकला व नाट्य या विषयांमुळे विद्यार्थ्यांची एकाग्रता वाढते, असे सांगत पाठ्यपुस्तकांतील 'क्यूआर कोड'ची उपयुक्तता स्पष्ट केली. यावेळी शिक्षण उपसंचालक दीपक चवणे यांनी स्वतःचे शालेय व स्पर्धा परीक्षेतील अनुभव सांगत विद्यार्थ्यांना अभ्यासासोबत अवांतर वाचनाचा मंत्र दिला.

**जगातील सर्वात मोठी प्रकाशन संस्था**

प्रास्ताविकात 'किशोर' मासिकाचे संपादक आणि मंडळाचे जनसंपर्क अधिकारी किरण केंद्रे यांनी बालभारतीच्या ६० वर्षांच्या प्रवासाचा रंजक आढावा घेतला. ''बालभारती ही आज १० भाषांमध्ये दरवर्षी १० ते १२ कोटी पुस्तके छापणारी जगातील सर्वात मोठी प्रकाशन संस्था आहे,'' असे ते म्हणाले. 'बालभारती' हे नाव मध्य प्रदेश शासनाकडून घेतल्याची आणि प्रसिद्ध चित्रकार दीनानाथ दलाल यांनी काढलेले बहीण-भावाचे मुखपृष्ठ पुढे संस्थेचे बोधचिन्ह बनल्याची आठवणही त्यांनी सांगितली.

सोहळ्याच्या प्रारंभी राज्यगीत व स्वागत गीत विद्यार्थ्यांनी गायले. कार्यक्रमात बालभारतीचा एकूण प्रवास यावर आधारित लघुपट दाखवण्यात आला. यावेळी सहायक उपसंचालक (शिक्षण) संजय पंचगले यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अजयकुमार लोळगे यांनी केले, तर प्रभारी भांडार व्यवस्थापक श्रीमती शुभांगी नांदखिले यांनी आभार मानले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# महावितरणच्या अभय योजनेला ग्राहकांचा प्रतिसाद; लातूर विभागातील ३७७ ग्राहकांनी घेतला लाभ

**लातूर/प्रतिनिधी** :महावितरणकडून कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित झालेल्या ग्राहकांसाठी सुरू करण्यात आलेल्या अभय योजनेला लातूर विभागात चांगला प्रतिसाद मिळत आहे. लातूर विभागामध्ये या योजनेसाठी एकूण ३०,६९८ ग्राहक पात्र असून, त्यापैकी आजपर्यंत ३७७ ग्राहकांनी या योजनेचा लाभ घेतला.

योजनेअंतर्गत ग्राहकांना थकबाकीवरील १०० टक्के व्याज आणि १०० टक्के विलंब शुल्क माफ करण्यात येत आहे. तसेच उर्वरित मूळ थकबाकीमध्ये परिपत्रकातील तरतुदीनुसार १० ते २० टक्क्यांपर्यंत सवलत देण्यात येत आहे. विशेष म्हणजे, दि. १५ डिसेंबर २०२६ पूर्वी योजनेत नोंदणी करणाऱ्या ग्राहकांना जास्तीत जास्त सवलतीचा लाभ मिळणार आहे.

या योजनेचा लाभ घेणाऱ्या लातूर विभागातील सर्वप्रथम नोंदणी करून लाभ मिळविणाऱ्या दोन ग्राहकांचा दि.



२६ नोव्हेंबर २०२६ रोजी लातूर विभागीय कार्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी संबंधित ग्राहकांना प्रशस्तीपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

महावितरणच्या या अभय योजनेमुळे कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित झालेल्या ग्राहकांना जुन्या थकबाकीतून दिलासा मिळण्याची संधी उपलब्ध झाली आहे. त्यामुळे लातूर विभागातील उर्वरित पात्र ग्राहकांनी दि. १५ डिसेंबर २०२६ पूर्वी योजनेत नोंदणी करून या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरण लातूर विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. अनिरुद्ध घाटगे यांनी केले आहे.

# रेणा साखर कारखान्यात ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांना रिफ्लेक्टर वितरण



**रेणापूर/प्रतिनिधी** : रेणापूर तालुक्यातील रेणा सहकारी साखर कारखाना येथे कारखान्याचे चेअरमन श्री. अनंतरावजी देशमुख, व्हा. चेअरमन ॲड.श्री. प्रवीण पाटील, जिल्हा प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या मार्गदर्शना खाली रेणा साखर कारखाना व प्रादेशिक परिवहन कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने रस्ते सुरक्षा सप्ताह अंतर्गत रेणा कारखान्याकडे ऊस वाहतुक करणाऱ्या वाहन चालकांना रस्ता सुरक्षेचे सखोल मार्गदर्शन करण्यात आले. यामध्ये ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर चालकांना रिफ्लेक्टरचे महत्व सांगण्यात आले. सध्या ऊस गाळप हंगाम सुरू असून असंख्य वाहने ऊसाची वाहतूक करतात. त्यामुळे संबंधित वाहन चालकांनी रस्ते वाहतुकीसाठी असलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करून वाहनांना रिफ्लेक्टर बसवण्याचे महत्व विशद करण्यात आले. तसेच ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांना परिवहन कार्यालया तर्फे ५०० रिफ्लेक्टर वाटप करण्यात आहे.

यावेळी रेणा साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन ॲड. श्री. प्रवीण पाटील, प्रादेशिक परिवहन कार्यालय लातूर येथील मोटार वाहन निरिक्षक शिवाजी सोनटक्के, व कारखान्याचे कार्यकारी संचालक बी.व्ही.मोरे, सचिव आर.बी. बरमदे, मुख्य शेतकी अधिकारी प्रशांत शेळके, चिफ इंजिनिअर प्रफुल्ल चव्हाण, चिफ केमिस्ट प्रदिप केदार, यांच्यासह ऊस वाहतूक करणारे चालक यांची उपस्थिती होती.

रोज वाचा
ऑनलाईन
लातूर समाचार
www.latursamachar.com

## बभ्रा ..

वारा बदले तसे वागा
बदला सदैव भुमिका
पादाक्रांत किती करी
कमी पडली भूमी का
बाष्कळबडबडणांच्या
जिव्हे झटक्यात विका
आत्मसन्मान मग पाहू
बिनधास्त मागा भिका
कोंडीतपकडून एखाद
फायदा घ्यायला शिका
गुपीतउघडा योग्यवेळी
कुणास ना यावी शंका
विजयीपक्षात वास्तव्य
ज्येताचा वाजला डंका
लिलावचालले बाजारा
रंगआपला न हो फिका
हरिश्चंद्र होण्याचा बुवा
आम्हीं ना घेतला ठेका
वरात जी चालतेजोरात
बा तिचाचं धरावा ठेका
रहस्यं सारे माहीत करे
वेळ पाहू द्यावा धक्का
धोकेबाज बसे शिक्का
कैक वेळा दिला धोका
आपल्यांहातात नाड्या
तो हुकमीएक्का फेका
संधी साधू होईलं बभ्रा
मुळी ना सोडावा हेका

– हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६..

# दयानंद इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीमध्ये संविधान दिन उत्साहात साजरा



**लातूर/प्रतिनिधी** : दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी येथे संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गोपालजी लोहिया यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. भारतीय लोकशाहीचा पाया असलेल्या संविधानाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावे आणि नागरिक म्हणून आपल्या मूलभूत हक्कांची व कर्तव्यांची जाणीव व्हावी, या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. लोकशाही, समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या घटनात्मक मूल्यांची जपणूक करण्याचा संदेश यावेळी देण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये संविधानाविषयी आदर, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना रुजविण्यावर भर देण्यात आला. राष्ट्रीय सेवा योजनेचे महाविद्यालयीन समन्वयक प्रा. प्रसाद कावळे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मराठवाडा रेल्वे कोच फॅक्टरीत २ वर्षांत केवळ १ हजार रोजगार उपलब्ध होणार

*खासदार डॉ. शिवाजी काळगे व लातूर जिल्हा बँकेचे चेअरमन धिरज देशमुख यांची रेल्वे फॅक्टरीच्या व्यवस्थापनाशी चर्चा*

**लातूर/प्रतिनिधी** : भाजपा सत्ताधाजयांनी खुप मोठ्या प्रमाणात गाजावाजा करुन मराठवाडा रेल्वे कोच फॅक्टरी लातूरला स्थापन केली. परंतु, गेल्या ९ वर्षांत मराठवाडा रेल्वे कोच फॅक्टरीत रोजगार निर्मिती झाली नाही. त्यामुळे स्थानिक भूमिपुत्रांमध्ये प्रचंड रोष निर्माण झाला. तरुणांनी उपोषण सुरु केले. या पार्श्वभूमिवर खासदार डॉ. शिवाजी काळगे व लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन धिरज विलासराव देशमुख यांनी दि. २७ नोव्हेंबर रोजी सायंकाळी मराठवाडा रेल्वे कोच फॅक्टरीत जाऊन किनेट कंपनीच्या व्यवस्थापनाशी सविस्तर चर्चा केली.

या चर्चेनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना जिल्हा बँकेचे चेअरमन धिरज देशमुख म्हणाले, मराठवाडा रेल्वे कोच फॅक्टरीत लाखो बेरोजगार तरुणांना रोजगार मिळेल, अशी स्वप्ने दाखवण्यात आली. परंतु, आम्हाला या लाखो रोजगारांचे आकडे मराठवाडा रेल्वे कोच फॅक्टरी सापडले नाहीत. येत्या २ वर्षांत केवळ १ हजार रोजगार उपलब्ध होणार आहे. यावरुन रोजगार निर्मितीच्या आकड्यांचा खेळ हा किती फसवा होता, हे लक्षात येते.

मराठवाडा रेल्वे कोच फॅक्टरीचे खुप मोठे स्वप्न स्थानिक तरुणांना




दाखवण्यात आले होते. परंतु, गेल्या ९ वर्षांत तरुणांच्या स्वप्नाचा चुराडा झाल्याचे समोर येत आहे. शुक्रवारी खासदार डॉ. शिवाजी काळगे आणि लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन धिरज विलासराव देशमुख यांनी मराठवाडा रेल्वे कोच फॅक्टरीला भेट दिली. त्यावेळी त्यांनी मराठवाडा रेल्वे कोच फॅक्टरीचे व्यवस्थापक सत्यमुर्ती, राघवेंद्र, कांताराजू आणि प्रदीप महाला यांच्याशी स्थानिक भूमिपुत्रांना रोजगार, रोजगार देऊन कसलेही कारण न देता काढून टाकणे, स्थानिक लघू उद्योजकांचे बील थकवणे, महिला कर्मचाजयांशी असभ्य वागणे आदी विषयांवर सविस्तर चर्चा केली. या चर्चे नंतर सत्यमुर्ती यांनी सकारात्मक प्रतिसाद देत उपोषणकर्त्या स्थानिक तरुणांनांचा फेरविचार करु, स्थानिकांना रोजगारात प्राधान्य देऊ, आश्वासन दिले.

या वेळी डॉ. शिवाजी काळगे यांनीही मराठवाडा रेल्वे कोच फॅक्टरीच्या व्यवस्थापनाला महत्वपूर्ण सूचना दिल्या. या सूचनांची अंमलबजाणी करण्याचे आश्वास व्यवस्थापनाने दिले. यावेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंके, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संतोष देशमुख, ॲड. प्रविण पाटील, प्रविण सूर्यवंशी, गुरुनाथ गवळी आदी उपस्थित होते.

दक्षिण मध्य रेल्वे
Follow us on @SCRailwaysindia
दक्षिण मध्य रेल्वे निविदा सुचनांचे सविस्तर विवरण आमची वेबसाइट www.scr.indianrailways.gov.in येथे पाहिले जाऊ शकते.
ई-निविदा सूचना क्र. C/E.29/Elec/M/SC/74/WS/OT/2026-27 दि. २५.११.२०२६
PUB/886
भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्याकरिता, खाली नमूद केलेल्या कामासाठी, अधोस्वाक्षरीकर्ता १७.१२.२०२६ रोजी १५.०० वाजेपर्यंत ई-निविदा आमंत्रित करत आहेत.
अनुक्रमांक: ०१ ई-निविदा क्र.: C/E.29/Elec/M/SC/74/WS/OT/2026-27/E-M-SC-74-OT-2026-27 कामाचे नाव: सिकंदराबाद विभाग, विद्युत देखभाल विभाग - (i) सिकंदराबाद विभागातील स्थानक इमारती, प्लॅटफॉर्मवरील छत (COPs), ठजक शेड आणि सेवा इमारतींवर विविध क्षमतेचे एकूण २०० KWp क्षमतेचे रूफटॉप सोलर प्लांट बसवणे स्वच्छतेच्या साहित्यासह; (ii) चार्लापल्ली स्थानकावरील प्लॅटफॉर्मच्या छतावर विविध क्षमतेचे एकूण ४५० KWp क्षमतेचे रूफटॉप सोलर प्लांट बसवणे स्वच्छतेच्या साहित्यासह आणि संबंधित विद्युत व्यवस्था करणे. निविदा मूल्य (रु.): ३,५१,३६,८४२.००; अनामत रक्कम (EMD) (रु.): ७,०२,७००.००; CTF (रु.): ०.००; काम पूर्ण करण्याचा कालावधी: ६ महिने
निविदेच्या अटी/इतर तपशील IREPS च्या www.ireps.gov.in या वेबसाइटवरील निविदा दस्तऐवजामध्ये उपलब्ध आहेत. येथून दस्तऐवज डाउनलोड करता येतील, निविदा प्रक्रियेत सहभागी होता येईल आणि काही बदल असल्यास ते पाहता येतील.
वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (एम), सिकंदराबाद
A1018
निविदेच्या अधिक अटी/विस्तृत विवरण आणि निविदा दस्तावेज डाउनलोड करण्यासाठी, कृपया https://www.ireps.gov.in किंवा www.scr.indianrailways.gov.in या संकेतस्थळाला भेट द्या.

निलंगा शहरातील
एलआयसी
विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स,
जनता दवाखान्यासमोर
शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लब मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क
Off: (02384) 242224,
9422612239,
9422658396

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, PRGI No. 47034 POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादक: दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ पिआरजिआय नं. ४७०३४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६